# मराठी कथा : प्रवाह आणि प्रकार

**डॉ. श्रीराम गडकर**
विद्याप्रतिष्ठानचे,
कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय
विद्यानगरी, बारामती, जि पुणे.
मो.नंबर. ९७६४८५००३५
इमेल: shriramgadkar@gmail.com

---

प्रास्ताविक:-

इंग्रजी राजवट सुरु झाल्यावर छापण्याची कला भारतात आली व त्यामुळे मराठी गद्याला निराळे वळण मिळाले. खरी मराठी कथा १८९० पासून म्हणजे 'करमणूक' मासिकाच्या जन्मापासून सुरु झाली असे मानले जाते. त्यापूर्वी सत्तर वर्शे ज्या कथा लिहिल्या गेल्या त्यांचे स्वरुप बहुतांषी भाषांतरीत, अनुकरणात्मक व अदभुतरम्य असे होते. स्त्री -पुरुषांनी रचलेल्या व पिढयान्पिढया सांगितलेल्या कथांच्या माध्यमातून मराठीतील लोककथा जतन झाली असावी व वृद्धिंगत झाली असावी. व्रते, सणांच्या वेळी सांगितल्या जाणाऱ्या पंचकन्यांच्या गोष्टी, वीरांच्या कहाण्या, हरतालिका, वटसावित्री इ. च्या कहाण्या म्हणजे व्रतांषी सांगड घातलेल्या लोककथा आहेत. जीवनाचे साधे तत्त्वज्ञान व व्यावहारिक अनुभवांचे मिश्रण या लोककथांमध्ये आहे. याशिवाय आजीने नातवंडांना सांगितलेल्या काऊचिऊच्या, भूताखेतांच्या, आटपाट नगरातील राजा-राणींच्या गोष्टींचा समावेष या लोककथांमध्ये होतो. स्त्रियांनी रचलेले हे कथा साहित्य आजही खेडयापाडयातील स्त्रियांच्या तोंडी आहे. कथा या साहित्य प्रकाराला महाराष्ट्रात फार पूर्वीपासूनची एक समृद्ध परंपरा लाभली आहे. महाराष्ट्रात ती संस्कृतमधील पंचतंत्राइतकी मागे जाते. प्राचीन मराठीपुरता विचार केला तर महानुभावांच्या दृष्टांतपाठापर्यंत जाते. प्राचीन कालखंडातील आख्यानकवी आणि षाहीरकवी यांची रचना पाहिली तरी त्यामध्ये पौराणिक कथा, ऐतिहासिक कथा, कल्पित कथा, विनोदी कथा, प्रेमकथा इ. प्रकार दिसतात. या सर्व रचनेत तत्कालीन समाजजीवनाचे अस्सल आणि जिवंत स्वरुप आपल्यापुढे उभे राहते.

**अव्वल इंग्रजी कालखंड:-**

अव्वल इंग्रजी कालखंडाच्या प्रारंभीच्या काळात सर्वसामान्य प्रौढ वाचकांसाठी जे साहित्य निर्माण होत होते ते पुष्कळसे भाषांतरीत होते. जी नियतकालिके प्रसिद्ध होत होती त्यातही बराच भर इंग्रजी वृत्तपत्रातल्या बातम्यांच्या भाषांतरावरच असे. पण काही काळानंतर स्वतंत्रपणे लिहिलेले लेख प्रसिद्ध होऊ लागले. भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' साप्ताहिकातून लोकहितवादींची 'शतपत्रे' प्रसिद्ध झाली. इंग्रजी षाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांची स्थापना झाल्यानंतर संस्कृत व इंग्रजीचा पद्धतशीर अभ्यास केलेला वर्ग निर्माण झाला. या दोन्ही भाशांमध्ये श्रेष्ठ दर्जाचे वाड्.मय आहे याची जाणीव होऊन ते मराठीत आणले पाहिजे असे त्या काळातील सुषिक्षितांना वाटू लागले. पण मराठी नाटक आणि कादंबरी हे वाड्.मय प्रकार मात्र एकोणिसाव्या शतकात नव्यानेच सुरु झाले. पंचतंत्रासारख्या कथावाड्.मयाची संस्कृतमधील परंपरा फार मोठी आहे. दशकुमारचरित्र आणि बाणभट्टांची कादंबरी या कथात्मक संस्कृत गद्यरचना प्रसिद्ध आहेत. प्राचीन मराठीत आख्यान काव्याच्या स्वरुपात कथा उपलब्ध आहे. बखरवाड्.मयात उदाहरण देण्याच्या निमित्ताने क्वचित प्रसंगी बखरकार कथा सांगतात. पण या कथेला स्वतंत्र अस्तित्व नाही. या अव्वल इंग्रजी कालखंडातील कथेबद्दल इंदुमती शेवडे म्हणतात की, "अव्वल इंग्रजी काळात मराठी कथा नवे रुप घेऊन अवतरली ती पाश्चात्य कथेच्या संपर्काने, जुन्या संस्कृत कथेचा किंवा मराठी लोककथेचा वारसा घेऊन नव्हे. तिचा वारसा पो पासून १८३२ साली निर्माण झालेल्या आधुनिक पाश्चात्य कथेचा. अव्वल इंग्रजीत मराठी गद्याचा विकास होऊन त्यात स्वतंत्र निर्मिती करण्याची कुवत येईपर्यंत मराठी कथेला भाषांतराच्या पांगुळगाडयाचा आधार घ्यावा लागला. तो तिने इंग्रजी, पार्षियन व संस्कृत कथांचा घेतला."[१] पाठयपुस्तकासाठी लिहिलेल्या उपदेशपर गोष्टी, ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी सांगितलेल्या बायबलमधील गोष्टी, बालमित्र, यांत्रिकक्रमण यासारखी भाषांतरीत पुस्तके या क्रमाने हे कथावाड्.मय धडपडत वाटचाल करु लागले. नव्याने अक्षर ओळख होऊ लागलेल्या वाचकवर्गासाठी त्याचे रंजन करण्यासाठी अद्भुतरम्य कथा निर्माण झाली. वेताळपंचविषी, गुलबकावली, हातिमताई आणि अरबी भाषेतील सुरस व चमत्कारीक गोष्टी हे त्याकाळात लोकप्रिय कथा वाड्.मय होते. भडक शृंगार असलेल्या आणि अभिरुचीच्या दृष्टीने कमी प्रतीच्या अशा अनेक कथा या कालखंडात लोकप्रिय झाल्या. या कालखंडातील कथेबद्दल डॉ. रा. गा. चवरे म्हणतात की, "अव्वल इंग्रजी कालखंड ही अर्वाचीन मराठी कथेची बाल्यावस्था होती. या कालखंडात सरकारने शिक्षणाचे माध्यम मराठी भाषा ठरवून कित्येक मनोरंजनपर

कथातून शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. याच वेळी मिषनऱ्यांनी नीती कथेच्या माध्यमातून धर्मप्रसाराची शिकस्त चालविली. या कालखंडात जेथे मुद्रणसोयी उपलब्ध होत्या, तेथेच अर्वाचीन मराठी कथेचा प्रथम आविश्कार झाला. परंतु दरम्यानच्या काळात प्राचीन परंपरा खंडीत झाल्यामुळे मोजकेच पण भाषांतराचे पीक आले. राजवट इंग्रजी असली तरी इंग्रजीबरोबरच फारषी, उर्दू, संस्कृत वाङ्.मयातील कथांचे मराठीत भाषांतर करण्याचे प्रयत्न झाले. म्हणून या कालखंडाला 'भाषांतर युग' म्हणतात."[२] मुद्रणकला व नवे शिक्षण यामुळे वृत्तपत्रांचा जमाना सुरु झाला. चमत्कारीक बातम्या देणे, नवीन ज्ञानबोधक माहिती देणे, नवे विचार समजावून देणे, नवीन भौतिक विद्यांचा प्रचार व प्रसार करणे अशा हेतूंनीच दिग्दर्शन, ज्ञानोपासक, ज्ञानप्रसारक यासारखी नियतकालिके प्रसिद्ध होत होती. ही नियतकालिके उपयुक्त व मनोरंजक गोष्टीही प्रसिद्ध करीत होती. याबद्दल अधिक माहिती देताना डॉ. प्र. न. जोशी म्हणतात, "राम कोलारकर यांनी 'सर्वोत्कृश्ट मराठी कथा: खंड १' (१८५४-१९२४) हा एक मराठीतील पहिल्यावहिल्या गोष्टींचा वा कथांचा संग्रह संपादित केला आहे. त्यांच्या मताने जिला गोष्ट वा कथा म्हणता येईल अषी एक कृती विश्णू घनष्याम यांनी 'मराठी ज्ञानप्रसारक' च्या लागोपाठ चार अंकात १८५४ मध्ये प्रसिद्ध केली. या मासिकाने पुढे दहा वर्षात १६-१७ गोष्टी छापलेल्या दिसतात. 'विलक्षण सोबती' (१८५५), 'हिरा' (१८५६), 'हरवलेला उंट' 'ईश्वराच्या षहाणपणाची गोष्ट', 'एका रुपयाचे चरित्र' (१८६०), 'दोनषे वर्शाची गोष्ट', 'कोंबडी आणि मुंगी' (१८६१), 'छायेची साक्ष', 'धाकटा कारकून', 'हरवलेले रत्न' (१८६२), 'गलबतावरील माणसांची गोष्ट', (१८६३), 'कृश्णाबाईची गोष्ट', (१८६४), अशा काही गोष्टी 'मराठी ज्ञानप्रसारक' मध्ये आल्या. त्या थोडया नव्या वळणाच्या होत्या. 'ज्ञानप्रसारका' नंतर गोष्टींसाठी लक्षात राहते ते 'विविध ज्ञानविस्तार' हे प्रसिद्ध नियतकालिक. पहिल्या दोन तपात या मासिकाने अनियमितपणे बारा गोष्टी प्रसिद्ध केल्या. 'काव्यविक्रयावर उतारा', खरे पातिव्रत्य', 'हदयद्रावक गोष्ट', (ब.रा.प्रधान), 'धनगराचे षहाणपण', 'झाले ते ठीकच झाले,' (ब.रा.प्रधान), 'जुळया बहिणी', 'सुंदरतेची संक्रांत', 'सोनाराची मुलगी', 'इराणचा सौदागर', 'सावत्र आई' अशा गोष्टी या सुमारास 'विविध ज्ञानविस्तार' मधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'ज्ञानसंग्रह', 'मनोरंजन', व 'निबंधचांद्रिका' या नियतकालिकातून 'भयंकर सूड', 'एका मांजराचे षहाणपण', 'दुर्गाताईची ओवाळणी', (ह.ना.आपटे) अशा काही गोष्टी प्रसिद्ध झाल्या. 'एका मांजराचे शहाणपण' ही एक मराठीतील १८८८ मधील उल्लेखनीय कथा म्हणून सांगितली जाते".[३] अव्वल इंग्रजी कालखंडातील कथांचे स्वरुप जुजबी व सामान्य होते. सुरुवातीच्या काळात उपदेशपरतेचा व उत्तर काळात अदभुतरम्यतेचा पगडा या काळातील लेखकांवर अधिक प्रमाणात बसल्याने पूर्वाधात षालोपयोगी गोष्टी लिहिण्याकडे व उत्तरार्धात अरबी-फारसी भाषेतील सुरस, चमत्कारीक गोष्टींची भाषांतरे, त्यांचे अनुकरण करण्याकडेच लेखकांची दृष्टी वळली. स्वतंत्र कथालेखन फारसे झाले नाही. या कालखंडातील कथेची समीक्षा करताना म. ना. अदवंत म्हणतात की, "१८०० ते १८८९ या कालखंडातील 'करमणूक' पूर्व कालखंडातील कथा ही अषी परप्रकाशित, सामान्य व दुबळी होती. तिला स्वतःची शैली नव्हती. स्वतःचा आकार नव्हता व स्वतःचे विश्व नव्हते. संस्कृत वरुन मराठीत भाषांतरीत झालेल्या कथांतून नितीबोध व कल्पनारम्यता होती. 'पंचतंत्र', 'हितोपदेश' यामधील कथांतून पशुपक्षी माणसांप्रमाणे बोलत व माणसांप्रमाणे व्यवहार करत. तर बृहत्कथा, वेताळपंचविषी, सिंहासनबत्तिषी अषांसारख्या ग्रंथातून अद्भुतरम्यतेचे वातावरण निर्माण केले जाई. अरबी भाषेतील कथांच्या रुपांतराने व अनुकरणाने अदभुतरम्यतेच्या जोडीला शृंगाररस आला व प्रेमाच्या भडक वर्णनांनी कथा नटू लागली. आंग्ल कथांपैकी षालेय पद्धतीच्या नीतिबोध करणाऱ्या कथांचीच भाषांतरे झाली. त्यामुळे हा सर्व कालखंड अद्भुत रम्यतेने व कल्पनारम्यतेने नटलेला आढळतो"[४] अव्वल इंग्रजी कालखंडातील कथेचे स्वरुप हे असे होते. अद्भुताचा पगडा वाचक आणि लेखक या दोघांवरही होता. ज्ञानप्रसार करणे व लोकजागृती करणे हे या काळातील नियतकालिकांचे ध्येय होते. त्यामुळे नीतिबोध, वाचकांचे मनोरंजन करण्यासाठी कथालेखन होत होते. इंग्रजी, संस्कृत, अरबी-फारषी या भाशांतून मराठी कथा भाषांतरीत झाल्यामुळे या कालखंडातील कथेत फारसे जीवनदर्शन येत नाही.

स्फुटगोष्ट:-

अव्वल इंग्रजी कालखंडातील कथेला अद्भुत व अवास्तवतेच्या तावडीतून सोडवून वास्तवाच्या सृष्टीत आणण्याचे कार्य 'करमणूक' पत्रातून हरिभाऊ आपटे यांनी लिहिलेल्या स्फुटगोष्टींनी केले. इ.स. १८९० मध्ये हरिभाऊ आपटे यांनी 'करमणूक' पत्र काढले. मराठी कथेच्या इतिहासात १८९० ते १९१० हा कालखंड 'करमणूक कालखंड' म्हणून ओळखला जातो. हरिभाऊ आपटे यांनी या पत्रातून लिहिलेल्या 'स्फुटगोष्टी' लोकप्रिय झाल्या. १९१० ते १९२६ हा कालखंड 'मनोरंजन' कालखंड म्हणून ओळखला जातो. लघुकथेच्या विकासाला या काळात याच मासिकाने प्रामुख्याने हातभार लावला व लघुकथा मराठी वाचकात लोकप्रिय केली.

हरिभाऊ आपटे यांनी व्यक्तिचित्रणावर भर देणाऱ्या काही स्फुट गोष्टी लिहिल्या. पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांचे दर्शन घडविताना त्यांच्या स्वभावातील विसंगतीवर बोट ठेऊन विनोदाची निर्मिती करण्याचा,

केवळ संवादातून कथेचा आशय व्यक्त करण्याचा प्रयत्न त्यांनी काही स्फुटगोष्टींमधून केला. हरिभाऊंच्या कथेची समीक्षा करताना डॉ. अंजली सोमण म्हणतात की, ''हरिभाऊंच्या दीर्घ कथांपेक्षा त्यांच्या छोटया स्फुटगोष्टी तंत्र दृश्टया अधिक परिणामकारक ठरलेल्या आहेत. या कथांमध्ये प्रसंगांची गर्दी व पाल्हाळ आढळत नाही. वेगवेगळया घटनांची मनोरंजक गुंफण न करता एखादा मध्यवर्ती प्रसंग घेऊन किंवा एखादे छोटे रहस्य घेऊन त्याभोवती कथेची उभारणी करण्याचा प्रयत्न ते छोटया गोष्टीतून करतात. 'स्फुटगोष्टी' चे लेखन करताना समाजाला बोध देऊन षहाणे करण्याची दृष्टी हरिभाऊंनी स्वीकारल्यामुळे त्यांच्या कथांच्या कलात्मकतेत बऱ्याच वेळा न्यूनत्व आलेले दिसते. गोष्ट सांगत असताना हरिभाऊ जेव्हा भाष्य करु लागतात किंवा कथेच्या षेवटी इसापाप्रमाणे तात्पर्य सांगू लागतात तेव्हा त्यांनी स्वीकारलेला बोधवाद त्यांच्या कथांना जाचक ठरतो''.[५] डॉ. अंजली सोमण यांचा हा अभिप्राय यथार्थ वाटतो. मध्यमवर्गीय जीवनातील साधेच पण भावोत्कट प्रसंग निवडून हरिभाऊंनी कथानिर्मिती केली. या कथांमध्ये जीवनात भेटणारी सामान्य माणसे चित्रित केली आहेत. यातील प्रसंग संभवनीय आहेत. मुख्य म्हणजे हे प्रसंग आपल्या अनुभवांषी जुळतात. याचा वाचकांना प्रत्यय आल्यामुळे वाचक हरिभाऊंच्या कथांकडे आकर्शित झाले. हरिभाऊंच्या बहुसंख्य कथा हे 'करमणूक' चे मोठे आकर्शण होते. तत्कालीन वाचक 'करमणूक' ची उत्सुकतेने वाट बघत असत.

हरिभाऊपूर्वकालीन कथेचे स्वरुप पाहता हरिभाऊंनी या क्षेत्रात केलेली कामगिरी उल्लेखनीय मानता येईल. मध्यमवर्गीय जीवनातील साधेच पण भावोत्कट प्रसंग घेऊन ते मोठया कलात्मकतेने त्यांनी आपल्या 'स्फुटगोष्टींतून रंगवले आहेत. 'करमणूकी'तून क्रमषः प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्यांच्या तुलनेने एक किंवा दोन अंकातून संपणाऱ्या लहान लहान गोष्टींना त्यांनी 'स्फुट गोष्टी' असे नाव दिले. 'लघुकथा म्हणजे लांबीने कमी असणारी कादंबरी' असाच त्या काळात समज होता. 'अपकराची फेड उपकारांनीच', 'काळ तर मोठा कठीण आला', 'थोडया चुकीचा घोर परिणाम' अशासारख्या प्रकरणात विभागलेल्या हरिभाऊंच्या दीर्घकथा म्हणजे छोटया छोटया कादंबऱ्याच आहेत. या कथांमधून प्रसंगांची गर्दी आहे, पात्रांची गर्दी आहे आणि वर्णनाचाही पाल्हाळ आहे. पण त्या काळी या सर्व 'स्फुटगोष्टी' समजल्या गेल्या. इतके लघुकथांचे स्वरुप या काळात लवचिक होते. त्यांच्या दीर्घ कथांपेक्षा त्यांच्या स्फुटगोष्टी परिणामाच्या, एकतेच्या दृष्टीने अधिक यषस्वी ठरल्या आहेत. नीतिबोध हा हरिभाऊंच्या लघुकथेतील एक महत्वाचा घटक आहे. कलाविलासापेक्षा नीतिबोधाकडे त्यांचे अधिक लक्ष आहे. हरिभाऊ आपटे यांच्या बरोबरीने इतर लेखकही कथालेखनाचे कार्य करीत होते. सहकारी कृष्ण, कृ. के. गोखले, ना. के. बेहरे, वा. गो. आपटे आणि काषीताई कानिटकर, लक्ष्मीतनया, आनंदीबाई शिर्के, वामनसुता या स्त्रीलेखिकाही पुढे आल्या.

**लघुकथा:-**

'करमणूक' च्या कालखंडात बीजारोपण झालेल्या लघुकथेच्या रोपाची वाढ करण्याचे काम १९१० नंतर 'मनोरंजन' मासिकाने स्वीकारले. 'करमणूक' कालखंडातच इ.स. १८८५साली 'मनोरंजन' चा प्रारंभ झाला होता. पण लघुकथेच्या विकासाचे कार्य या मासिकातून खऱ्या अर्थाने १९१०नंतरच सुरु झाले. त्यामुळे १९१० ते १९२६ या कालखंडास 'मनोरंजन' कालखंड असे म्हणतात. या कालखंडाबद्दल म. न. अदवंत म्हणतात की, '' 'मनोरंजन' च्या कालखंडात दोन गोष्टी मुख्यतः दिसून येतात. या काळात स्त्री विषयक दृष्टीकोन बदलून तो अधिक व्यापक व विषाल झाला. स्त्रीशिक्षण, स्त्रियांची उन्नती या सारख्या प्रष्नांकडे पाहण्याची दृष्टी अधिक उदारमतवादी झाली. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तंत्र देवताः' हे मुळी 'मनोरंजन' चे ब्रीदवाक्य होते. त्यामुळे सुशिक्षित स्त्रीपुरुशांची चित्रे या काळात लघुकथांतून यावयास लागली. 'करमणुकी' च्या काळात 'माजघरा' त असलेली स्त्री आता हळूहळू दिवाणखान्यात येऊ लागली व पुरुशांषी वादविवादही करु लागली. पूर्वीच्या 'लक्ष्मीबाई', 'गंगाबाई', जाऊन त्यांच्या जागी थोडयाफार षिकलेल्या 'कालिंदी', 'सुधा' वगैरेसारख्या तरुणी येऊ लागल्या. दुसरी गोष्ट म्हणजे महाराश्ट्रीयांचे लक्ष परप्रांतीय वाड्.मयाकडे-विशेषतः वंग वाड्.मयाकडे वळले. त्यामुळे प्रभातकुमार मुखर्जी, रविंन्द्रनाथ टागोर, प्रेमचंद इ. लेखकांच्या ललितकृती मराठी पेहराव चढवून पुढे येऊ लागल्या. इंग्रजी कथा लेखकांकडेही या काळात लेखकांचे लक्ष जाऊन त्यांच्या कथांची रुपांतरेही मराठीत येऊ लागली. मराठी कथेचे स्वरुप त्यामुळे हळुहळू बदलू लागले. 'संपूर्ण कथा म्हणजे छोटी कादंबरी' ही पूर्वीची दृष्टी आता बदलू लागली. कथेतील नीतिबोधाचे प्राबल्यही हळूहळू कमी होऊ लागले. वर्णनाचा पाल्हाळ, प्रसंगाची गर्दी याही गोष्टी आता जाऊन लघुकथा खऱ्या अर्थांने लघुकथा व्हावयास लागली. अर्थात 'यशवंत' काळातील रेखीवता व तंत्रशुद्धता या काळात दिसत नसली तरी त्या दिषेने लघुकथेची वाटचाल या काळात सुरु होती. प्रत्येक अंकात कमीत कमी एक संपूर्ण गोष्ट देऊन 'मनोरंजन' सारख्या या काळातील मासिकांनी लघुकथेविषयी कुतूहल व आवडही वाचकवर्गात निर्माण केली''.[६] षाळा महाविद्यालयातून इंग्रजी वाड्.मयाच्या अभ्यासाने शेले, बायरन, ब्राऊनिंग इ. कवींच्या रोमँटीक कल्पनेंचे सुशिक्षित वर्गात आकर्शण निर्माण झाले. असाच प्रणय भावनेचा आविश्कार मराठी कथेतही होऊ लागला. प्रेमकथांचा

नवशिक्षित वाचकवर्ग हळूहळू तयार झाला. रा. गो. चवरे म्हणतात, 'श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, न. चिं. केळकर, शि. म. परांजपे, वामन मल्हार इ. साहित्यदिग्गज या काळात लेखन करत होते. गडकरी, खांडेकर, माडखोलकर, खाडीलकर, अत्रे यांना गुरुस्थानी असलेल्या श्रीपाद कृशणांच्या वाड्.मयीन श्रेष्ठतेचा हा काळ. यालाच कोल्हटकर युग असे म्हटले गेले. न. चिं. केळकर व श्रीपाद कृशणांनी हिरीरीने स्वीकारलेल्या कलामूल्यांचा प्रभाव तत्कालीन लेखकांवर पडला असल्यास नवल नव्हे. या काळात वि. सी. गुर्जर, कॅ. गो. ग. लिमये, दिवाकर कृष्ण, वा. ना. देशपांडे, कृ. के. गोखले, ना. ह. आपटे, आनंदीबाई शिर्के, गिरीजाबाई केळकर यांचे कथालेखन प्रतिधिनिक स्वरुपात सुरु असले तरी विठ्ठल सिताराम गुर्जर यांची रंजनप्रधान कथा विशेष विचारणीय ठरते''.[७] वि. सी. गुर्जर यांची अनुवादित व स्वतंत्र कथा ही घटनाप्रधान आहे. कृ. के. गोखले यांच्या कथा लेखनाचा कल उघड उघड मनोरंजनाकडे आहे. त्यांच्या कथेचे कथानक गुंतागुंतीचे आहे. अनेक इंग्रजी कथा त्यांनी रुपांतरीत केल्या आहेत.

ना. ह. आपटे यांच्या कथेत मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाचे वास्तव चित्रण आहे. त्या चित्रणात जिव्हाळाही आहे. पण पुष्कळ वेळा नीतिबोध कथनाचे सूत्र कटाक्षाने सांभाळण्याच्या हव्यासापायी त्यात रसभंग झालेला आहे.

आतापर्यंत बऱ्याच अंशी घटनाप्रधान असलेल्या कथेला व्यक्तिदर्शनाभिमुख बनविण्यात दिवाकर कृष्ण यांनी हातभार लावला. 'समाधी आणि इतर गोष्टी', (१९२७) व 'रुपगर्विता आणि सहा गोष्टी' (१९४९) या कथासंग्रहांच्या माध्यमातून त्यांनी मराठी लघुकथेवर कलात्मक सौदर्यांचा साज चढविला. पहिल्या कथासंग्रहातील पोपट, शांता, शाषी, आत्माराम, लीलागौरी व मृणालिनी या सर्वस्वी निरपराध व दुर्देवी जीवांच्या दुःखमय कथा सहानुभुतीने लिहिल्या आहेत. दिवाकर कृष्ण यांनी मराठी लघुकथेला जे नवीन वळण लावले त्यात वैशिष्ट्यपूर्ण भर घालून लघुकथेला नावारुपाला आणण्याचे कार्य प्रा. ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांनी केले. या कालखंडातील हे दोन आघाडीचे लेखक होते. केवळ लघुकथेच्या क्षेत्रात नव्हे तर कादंबरी, लघुनिबंध, टीका याही क्षेत्रात त्यांनी महत्वपूर्ण कामगिरी केली. लघुकथेच्या क्षेत्रात या दोघांनी जी मोलाची भर घातली त्यामुळेच या कालखंडाला फडके -खांडेकर कालखंड असे म्हणतात.

प्रा. ना. सी. फडके यांनी १९२६ साली 'रत्नाकर' मासिकातून कथा लेखनास प्रारंभ केला. हरिभाऊंची गोष्ट आणि वि. सी. गुर्जर यांची गोष्टीवेल्हाळ रंजक कथा हे पूर्वसूरी कथाकार त्यांच्यासमोर होते. सुबक, रेखीव, घाटदार, नाटयपूर्ण कथांचे त्यांना आकर्षण होते. सातत्याने कथालेखन करणाऱ्या प्रा. ना. सी. फडके यांनी 'गुजगोष्टी' भाग पहिला, भाग दुसरा, लीला आणि इतर गोष्टी, अभ्यंगस्नान, नमुनेदार गोष्टी, उल्हासकथा, लाडकी लक्ष्मी आणि इतर गोष्टी, जीवाचं मैतर, सोबत, प्रीतीपुष्प, चंद्रा आणि इतर गोष्टी, ऊन आणि सावल्या, बहार, प्रेम पाहावं करुन, उसनी मिठाई, कुणाचेही षेजारी, अत्तर गुलाब, राहिलेले ते गंगाजळ, मिठी, बाजूबंद, बावनकशी, घास भरवायला हवा, आपलेच दात आपलेच ओठ इ. कथासंग्रह प्रकाशित केले. दिवाकर कृष्ण यांनी जेवढया कथा लिहिल्या त्याहीपेक्षा अधिक कथासंग्रह प्रा. ना. सी. फडके यांनी लिहिले. प्रा. ना. सी. फडके यांचे कथाविश्व कलासंपन्नतेने भरलेले आहे. विविध प्रकारचे अनुभव ते मोठया कौषल्याने टिपतात व त्यांना मजेदार कथारुप देतात. शिर्षक, प्रारंभ, प्रसंगाची गुंफण, संवाद, भाषाषैली, वातावरणनिर्मिती, उत्कंठा, विस्मय, उकल, कलाटणी, कथेचा शेवट या सर्व तांत्रिक बाबींकडे वाचकांचे लक्ष जावू नये याची काळजी घेतात. प्रा. ना. सी. फडके यांच्या या तंत्रातून कलावाद जन्माला आला व अनेक लेखकांनी पुढे प्रा. ना. सी. फडके यांचे अनुकरण केले.

वि. स. खांडेकर यांनी प्रा. ना. सी. फडके यांच्या बरोबरीने मराठीत उत्तम लघुकथा लिहून मराठी कथेला योगदान दिले. प्रा. ना. सी. फडके यांच्यासारखेच वि. स. खांडेकरही कादंबरीकार म्हणून यष मिळवित होते. 'कलेसाठी कला' या प्रा. ना. सी. फडके यांच्या विचारास उत्तर म्हणून 'जीवनासाठी कला' ही दृष्टी समोर ठेवून वि. स. खांडेकर आपल्या साहित्याची निर्मिती करीत होते. सामाजिक दृष्टी व पूर्ववयातील कोल्हटकर संप्रदायाचे घट्ट संस्कार या दोन परस्परविरुद्ध टोकांवर वि. स. खांडेकर यांची लेखनसृष्टी उभी राहिली आहे. या दोन टोकांची जुळणी करण्याचे प्रयत्न वि. स. खांडेकर यांच्या हातून होतात व त्यांच्या साहित्यकृतीची निर्मिती होते. खांडेकरांची मनोवृत्ती कवीची आहे. त्यांचे मन संस्कारक्षम व भावनाषील आहे. समाजसुधारणेची तळमळ त्यांच्याजवळ आहे. गांधीवाद व समाजवाद हा विचारप्रवाह आणि राष्ट्रीय चळवळीने प्रभावित होऊन त्यानुसार एक नवी ध्येयसृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न ते आपल्या कथासाहित्यातून करतात. खांडेकरांच्या जीवनवादाचे प्रतिबिंब त्यांच्या कथासृष्टीत उमटले. समाजातील रंजल्यागांजलेल्यांच्या मूळ भावनांना वाचा फोडण्याचा खांडेकरांचा प्रयत्न उठावदार वाटतो. स्त्रीजीवनातील दुःखाचे दर्शन घडविणे आणि नवसमाज निर्माण करणे ही स्वप्ने उराषी बाळगून त्यांनी कथालेखन केले. त्याग, विनय, प्रामाणिकपणा, विवेक, संयम या गुणांचे ते आपल्या कथांमधून चित्रण करतात. या अमानुश जगात त्यांच्या सत्प्रवृत्त पात्रांच्या वाटयाला जीवनभर दुःख किंवा जाच येतो. या प्रसंगाला त्यांची पात्रे अत्यंत संयमाने सामोरी जातात. याच काळात वि. स. खांडेकर यांनी एक नवी भर मराठी कथावाड्.मयात घातली.

इसापनीती व पंचतंत्र या कथांच्या धर्तीवर, पण आधुनिक काळाला अनुरुप अशा आषयाची नवी नीती कथा, रुपककथा वि. स. खांडेकर यांनी मराठीत रुढ केली. खांडेकरांची काव्यात्मक वृत्ती, सुभाशितवजा लेखनषैली, सूचकता, कल्पनाविलास या गुणांना या कथेत वाव मिळाल्याने हा कथाप्रकार वि. स. खांडेकर यांना अधिक मानवला. आरसेमहाल, तीन कलावंत, षांती, दोन भूते, षिखर, घरटे आणि धरणीकंप, चकोर आणि चातक या रुपककथांतून सूचकता व काव्याच्या पद्धतीने तत्वप्रतिपादक व जीवनदर्शन घडविण्याचे कौषल्य दिसून येते. रुपककथा ही वि. स. खांडेकर यांनी मराठी कथेला दिलेली वैशिष्ट्यपूर्ण देणगी आहे.

प्रा. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर या दोन आघाडीच्या कथाकारांबरोबरच य. गो. जोशी, वि. वि. बोकील, अनंत कणेकर, लक्ष्मणराव सरदेसाई, भा. वि. वरेरकर, कुमार रघुवीर, द. र. कवठेकर, ख. सा. दौंडकर इ. कथाकारांनी लघुकथा लेखन करुन मराठी कथावाङ्.मयात वैशिष्ट्यपूर्ण भर घातली आहे.

मध्यमवर्गीयांचे कौटुंबिक जीवन हे क्षेत्र य. गो. जोशी यांनी आपल्या लघुकथांसाठी निवडले. मध्यमवर्गीयांच्या भावना अतिषय आत्मीयतेने व जिव्हाळयाने त्यांनी आपल्या कथेतून चित्रित केल्या. या कालखंडात एकत्र कुटुंबपद्धती मागे पडून विभाजनाकडे हळूहळू मध्यमवर्गीयांचा कल होत होता. मध्यमवर्गांच्या जीवनक्रमाची जुनी चैकट खिळखिळी होत होती. शेवग्याच्याशेंगा, कोथिंबिरीच्या वडया, सुपारी यासारख्या कथांतून भावा-बहिणीच्या प्रेमभावनांचे चित्रण येते. 'वहिनीच्या बांगडया' यासारख्या कथेतून दीर-भावजयीच्या सोज्वळ प्रेमाचा प्रत्यय येतो. कर्ज फिटले पण सावकार गमावला, कोसळलेली भिंत, आला का रे बाळकृष्ण, अन्न आणि अन्न, आई यासारख्या त्यांच्या कथांमधून कौटुंबिक भावना जिव्हाळयाने रंगविण्याचे त्यांचे सामथ्र्य दिसून येते. त्यांच्या कथेतून घडणारे जीवनदर्शन सोज्वळ व माणुसकीच्या भावनेने ओथंबलेले आहे. त्यामुळेच माई, अन्नपूर्णाबाई, मथुराकाकी, वहिनी इ. सारखी प्रभावी व मनाची पकड घेणारी व्यक्तिचित्रे ते निर्माण करु शकतात.

प्रा. अनंत काणेकर यांच्या कथेत भाषाविलास व कल्पनाविलास अधिक आढळतो. अद्भुतरम्यता, योगायोग, भाषेची आतशबाजी आणि पाल्हाळ इ. वैशिष्ट्ये त्यांच्या कथेत दिसतात. जगातील ही विरोधी परिस्थिती दाखविण्यासाठी त्यांनी 'दिव्यावरती अंधार' या कथासंग्रहात जी नऊ व्यक्तिचित्रे चित्रित केली आहेत ती अतिषय परिणामकारक अषी वठली आहेत.

प्रा. श्री. म. माटे यांनी ऐन उमेदीच्या काळात पदरमोड करुन अस्पृष्यांची सेवा केली. 'उपेक्षितांचे अंतरंग' जाणण्यासाठी अनेक कथा निर्माण केल्या. प्रा. श्री. म. माटे यांना तंत्राची पर्वा नव्हती. प्रा. माटे यांच्या कथा पात्रप्रधान असून ही पात्रं दलित, उपेक्षित आहेत. प्रा. माटे यांनी ही पात्रं आपल्या समर्थ लेखणीने जिवंत केली. उपेक्षितांचे अंतरंग, माणुसकीचा गहीवर, अनामिका हे प्रा. श्री. म. माटे यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

कुसुमावती देशपांडे यांनी रुढ चाकोरीतून चालणाऱ्या मराठी कथेस काहीसे वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला. आपल्या कथेत त्यांनी स्त्रीमनाचे वैयक्तिक भाव अत्यंत संयमाने चित्रित केले आहेत. आटोपशीर, काव्यात्मकता, चिंतनशीलता ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये दिसून येतात. कुसुमावती देशपांडे यांची कथा अनेकदा शब्दचित्रांचे, रुपपकथांचे रुप धारण करताना दिसते.

याच सुमारास र. वा. दिघे यांनी निसर्गाच्या पार्श्वभूमीवर अद्भुतरम्य व कल्पकतापूर्ण असे कथानक आपल्या कथेतून निर्माण केले. ग. ल. ठोकळ यांच्या कथा ग्रामीण जीवनावर आधारीत आहेत. खेडेगावातील जीवनाच्या समस्या, खेडयातील लोकांच्या समस्या, त्यांचे दैन्य-अज्ञान इ. गोष्टींचे चित्रण ते आपल्या कथेतून करतात.

चि. वि. जोषशी यांच्या चिमणराव व गुंडयाभाऊ या मानसपुत्रांनी वाचकांच्या मनाची पकड घेतली. एकीकडे गुदगुल्या करीत दुसरीकडे लहानमोठया विसंगीतीची जाणीव वाचकांना करुन द्यायची. व्यक्तीजीवनातील व समाजजीवनातील अनेक नव्या-जुन्या, विसंवादी गोष्टींवर प्रकाश टाकायचा आणि हसतखेळत, वाचकांना न दुखावता त्यांना अंतर्मुख करायचे ही त्यांच्या विनोदी कथांची बैठक आहे. त्यांच्या विनोदात वास्तवता आहे. मानवी स्वभावाचे व समाजाचे त्यांचे निरीक्षण अतिषय सूक्ष्म आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनात आढळणाऱ्या विसंगतीवरच ते आपल्या विनोदाची उभारणी करतात. विनोदी लेखक म्हणून आचार्य प्र. के. अत्रे यांचे नाव मराठी साहित्यात खूपच गाजलेले आहे. नाटक, काव्य आणि बोलपटसृष्टी या क्षेत्रातील त्यांची कामगिरी सर्वश्रुत आहे. त्यांच्या लेखात व भाशणात विनोदाची पेरणी असते. त्यांनी विनोदी कथाही लिहिल्या आहेत.

स्त्रीजीवनाविषयक विविध प्रश्न स्त्रियांच्या दृष्टीकोनातून मांडण्याचा या लेखिकांनी प्रयत्न केला. विभावरी शिरुरकर यांचा 'कळयांचे निःश्वास' हा कथासंग्रह या काळात फारच गाजला. स्त्रीमनाचे सखोल विष्लेशण, तिच्यापुढे पडलेल्या निरनिराळया सामाजिक समस्या व रुढीच्या आणि बदलत्या परिस्थितीच्या कात्रीत सापडल्यामुळे त्यांच्या जीवनाची झालेली परवड या सर्वांचे चित्रण विभावरी शिरुरकर यांनी या कथांमधून अतिषय जिव्हाळयाने केले आहे. 'कळयांचे निःश्वास' या कथासंग्रहातील सर्व कळया कोमेजलेल्या आहेत. परिस्थितीने, अवहेलनेने व उपेक्षेने त्या

मनातल्या मनात कुढत आहेत. लोकनिंदेच्या वणव्यात त्या होरपळून जात आहेत. अशा कळयांना विभावरी शिरुरकर यांनी बोलके केले आहे. त्यांना आपली दुःखं सांगण्यास भाग पाडले आहे. प्रत्येकीचे दुःख निराळे आहे. स्त्री जीवनातील वैवाहिक समस्या, स्त्री-पुरुशांच्या वाढत्या परिचयामुळे स्त्री जीवनात निर्माण झालेले प्रश्न यांचे चित्रण अतिषय परिणामकारक रीतीने या कथांतून लेखिकने केले आहे. स्त्रीमनाचे अत्यंत सूक्ष्म व सखोल मनोविष्लेशणही अतिषय परिणामकारक रीतीने केले आहे. याशिवाय या कालखंडात सौ. कमलाबाई टिळक, सौ. शांताबाई नाशिककर, सौ. कुमुदिनी रांगणेकर, सौ. आनंदीबाई किर्लोस्कर, कमलाबाई बंबेवाले, मालतीबाई दांडेकर इ. कथालेखिकांनी मराठी लघुकथेचे दालन समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

वामन चोरघडे यांची कथा ग्रामीण बोलीतील खुमासदारी व निसर्गाचा ताजेपणा घेऊन आली. त्यांच्या कथेत भूतदयावाद आहे, कारुण्य आहे, यौवनाचा उन्माद आहे. जीवनावर भाष्य आहे 'करमणूक' काळातील कथा 'मनोरंजन' काळात अधिक विकसित झाली. 'करमणूक-मनोरंजन' कालखंडात कथानकप्रधान असलेली लघुकथा या काळात स्वभावप्रधान झाली. प्रादेशिक वातावरणावर भर देणाऱ्या कथा मराठीत लिहिल्या जाऊ लागल्या.

म. ना. अदवंत म्हणतात, "१९२६ नंतरची एकोणीस वर्षेम्हणजे लघुकथेच्या आत्यंतिक उत्कर्शाचा काळ होय. १९२६साली 'रत्नाकर' मासिक सुरु झाले. त्यानंतर दोनच वर्षांनी १९२६ साली प्राधान्याने लघुकथेला वाहिलेले 'यशवंत' मासिक सुरु झाले. या दोन मासिकांनी व याच काळातील ज्योत्स्ना, किर्लोस्कर, समीक्षक, संजीवनी, धुरव, प्रतिभा, इ. नियतकालिकांनी मराठी लघुकथेचे दालन चांगलेच समृद्ध केले. मराठी लघुकथेच्या वाढीला या कालखंडाच्या प्रथमार्धात 'रत्नाकर' व 'यशवंत' या मासिकांनी व उत्तरार्धात 'किर्लोस्कर' व 'समीक्षक' या मासिकांनी चांगलाच हातभार लावला. १८९०-१९२६ या कालखंडाला 'करमणूक-मनोरंजन' कालखंड असे संबोधावयाचे असेल तर १९२६ ते १९४४ या कालखंडाला 'यशवंत-किर्लोस्कर' कालखंड असे संबोधावयास हवे. इतकी लघुकथेच्या विकासाला या दोन मासिकांनी मदत केली आहे".[८] लघुकथेने या कालखंडात विकासाचा फार मोठा टप्पा गाठला. लघुकथेच्या कलात्मक विकासाचा हा कालखंड आहे. या कालखंडात एक बाजूने हरिभाऊ आपटे, वि. सी. गुर्जर यांच्या काळाषी दिवाकर कृशणांची कथा संवाद साधते तर दुसऱ्या बाजूने वामन चोरघडे यांची कथा नवकथेशी संवाद साधते. गांधीवाद, मार्क्सवाद, पहिले महायुद्ध, औद्योगिकीकरण, मजूर वर्ग, स्वातंत्र्य चळवळ इ. मुळे समाजजीवन बदलले. कथेला नवे विषय मिळाले. कथेच्या सर्वच अंगांचा विकास करणारे विविध प्रयोग या काळात झाले. याच कालखंडात र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ यांच्या प्रादेशिक कथेने जनमानसावर ठसा उमटविला. प्रा. श्री. म. माटे यांच्या दीनदलितांच्या कळवळयातून कथेमधून उपेक्षितांना स्थान मिळाले. स्त्री कथाकारांची कथा चांगल्या संख्येने निर्माण होऊ लागली. कथेचा आशय आणि विषयाच्या कक्षा विस्तारल्या.

**नवकथा:-**

१९४५ नंतरच्या काळात दुसरे जागतिक महायुद्ध, यंत्रयुग, विज्ञान आणि मानसषास्त्राच्या क्षेत्रात झालेले नवे संशोधन यांनी मानवी जीवनात काही मुलभूत प्रश्न निर्माण केले. महायुद्धामुळे आलेली आर्थिक मंदीची लाट, यंत्रामुळे मानवी जीवनात आलेली यांत्रिकता आणि मानसशास्त्रीय संशोधनाने श्रद्धा आणि नीतीमूल्यांविषयी निर्माण झालेली साशंक दृष्टी या सर्वांचा परिणाम कथावाड्.मयावरही झाला. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर या कथाकारांच्या समर्थ लेखणीतून नवकथा उदयाला आली. व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण कथेला मराठी कथा वाड्.मयात महत्वाचे स्थान प्राप्त करुन दिले. 'सत्यकथा' मासिकाने आपले जुने वळण बदलले. 'अभिरुची' नव्या वाड्.मयीन ललितकृतींच्या षोधात राहिले. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर, पु. भा. भावे हे नव्या दमाचे कथाकार आगळयावेगळया पद्धतीने लिहू लागले.या बदलणाऱ्या वातावरणावर भाष्य करताना म. ना. अदवंत म्हणतात, "१९४५ च्या आसपास मराठी लघुकथांतील बदललेल्या मूल्यांची कल्पना अधिक स्पश्टपणे येऊ लागली. 'सत्यकथा', 'अभिरुची', 'साहित्य' यासारखी मासिके व द्वैमासिके नवी कथा व नवे काव्य आवर्जून प्रसिद्ध करु लागली. अरविंद गोखले यांची 'कोकराची कथा' ही नावाजलेली कथा याचवर्शी 'सत्यकथे' च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. मराठी कथा नव्या दिषेने वाटचाल करु लागली ती याच कथेपासून. आशय व अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत या काळापासून मराठी लघुकथेत बदल दिसून येऊ लागला. ती अधिक सूक्ष्म व अंतर्मुख झाली. दुसऱ्या महायुद्धाने समाजावर जी विफलतेची छाया पडली व मानवी जीवनातील चिरंतन मूल्ये धडाधड कोसळून पडलेली दिसल्यामुळे जी अश्रद्ध वृत्ती समाजाच्या ठिकाणी निर्माण झाली होती. तिचे अतिवास्तव आणि अतिकटू चित्रण ती करु लागली. दुसऱ्या महायुद्धाने उद्ध्वस्त झालेल्या विष्वाचे व मानवतेच्या विटंबनेचे दर्शन ती घडवू लागली. त्यासाठी मनोविष्लेशणाच्या तंत्रांचा आश्रय करुन माणसाच्या अंतर्मनात खोलवर दडून बसलेल्या सुप्त-अर्धसुप्त आषा-आकांक्षाची, दबलेल्या विचारांची, विकृत भावनांची चित्रे ती रंगवू लागली. त्यासाठी तिने आपले बाहय स्वरुप व आकारही बदलला. १९४५ नंतरच्या काळातील कथेत अंर्तबाहय

होत असलेला हा बदल प्रामुख्याने अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे व व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांतून स्पश्टपणे जाणवू लागला. त्यामुळे त्यांच्या कथांचा विचार हाच आजच्या लघुकथांचा विचार ठरेल".[९] गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर यांना त्यामुळेच नवकथेचे चतु:स्तंभ असे म्हटले जाते.

गंगाधर गाडगीळ या प्रतिभासंपन्न कथाकाराने अगदी वेगळया प्रकारची कथा लिहायला सुरुवात केली. सहज लक्षात येणारी बाळबोध कथा मागे पडली होती. फडके-खांडेकर इ. कथाकारांच्या वाङ्.मयात दिसणारी सुखविलासी, ध्येयवादी सृष्टी त्यांना भोवती आढळली नाही. मानवी जीवनात काही रम्य, सुंदर, तरल असे काही त्यांच्या प्रतिभेला भावत नव्हते. जिकडे तिकडे बजबजपुरी, लोभ, अमानुश संघर्श, क्षुद्रत्वाचा उद्रेक, षालीनतेचे-त्यागाचे मुखवटे चढवलेले प्रतिश्ठित अषी सारी विपरीत वाटणारी परिस्थिती त्यांनी पाहिली, अनुभवली. विसंगतीचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. 'कडू आणि गोड', 'नव्या वाटा' या कथासंग्रहातून त्यांची नवकथा प्रत्ययास येते. कडू आणि गोड, गिचमीड, गुणाकार, प्रलय, बोट बुडाली, गाळ आणि फेस, माणसाचे दु:ख, प्रयाण, पावसाळी हवा, अशा अनेक उत्कृश्ट कथातून गंगाधर गाडगीळ यांच्या लेखनशक्तीचे मर्म लक्षात येते. किडलेली माणसे, बिनचेहऱ्याची संध्याकाळ, भागलेला चांदोबा, अदृष्य किरण, कशी झाली गंमत, कबुतरे, आंधळे दळण अशा आणखी काही कथांचा यासंदर्भात उल्लेख करता येईल. समाजातील विसंगती गंगाधर गाडगीळ यांनी हेरली. त्यांना सारेच काही अर्थशून्य वाटले. गूढ व अनाकलनीय अशा नियतीची लहर, बाहुल्यांसारखी वावरणारी माणसे, माणसाची झालेली फरफट, त्याला आलेले एकटेपण, त्याच्यासमोर असणारी निराषा, क्रियाशून्यता, वासनेची वखवख हे सर्व नजरेआडचे विश्व त्यांच्या कल्पकतेने हेरले. माणसामाणसातील पशूत्व शोधले. मानवी मन हे अत्यंत गुंतागुंतीचे, संमिश्र, अनाकलनीय आहे. त्याचा थांग लागणे कठीण आहे, त्याच्या आचारावरुन-बोलण्यावरुन अनुमान काढणे इष्ट नाही असेच गाडगीळ यांची कथा सांगते. गाडगीळांच्या कथेवर भाष्य करताना सुधा जोशी म्हणतात की, "गाडगीळांच्या कथेचे महत्व केवळ ऐतिहासिक स्वरुपाचे आहे असे नाही. एक मूल्ययुक्त कथा म्हणून स्वतंत्रपणेही तिचा विचार करणे महत्वाचे ठरते. बीजधर्मित्व आणि वृक्षधर्मित्व अषी दुहेरी स्वरुपाची गुणवत्ता तिच्यात आहे. याचा अर्थ अर्थातच असा नव्हे की, कथा या साहित्यप्रकाराच्या ज्या षक्यता आणि क्षमता त्यांनी दाखवून दिल्या त्या सर्वांचाच कस त्यांनी पुरता जोखला. एक ठळक उदाहरण म्हणजे 'फॅंटसी' हा कथाप्रकार म्हणून त्यांनी योजला आणि फॅंटसीचा घटक अनेक कथातून विविध प्रयोजनासाठी कल्पकपणे वापरला. हे नाविन्य, ही प्रयोगषीलता निश्चितच कथासंकल्पना अधिक खुली करणारी होती.".[१०] नवकथेच्या निर्मितीत अरविंद गोखले यांचाही वाटा आहे. यशवंत, रत्नाकर, सत्यकथा, किर्लोस्कर इ. मासिकांतून अरविंद गोखले यांच्या कथा प्रसिद्ध होत होत्या. १९४५ मध्ये त्यांची 'कोकराची कथा' त्यांनी लिहिली तेव्हा त्यांच्या लेखणीचे सामथ्र्य सर्वांच्या लक्षात आले. मंजुळा, नर, कमळण, रिक्ता, गंधवार्ता, आभा सावंत, वेडी बाभूळ, अविधवा, अनय अशा कित्येक उत्कृश्ट व वेगळया वळणाच्या कथा अरविंद गोखले यांनी लिहिल्या. त्यांची कथा चित्तवेधक आहे. ती माणसाच्या अंतर्मनाचा शोध घेते. त्यांची कथा अगदी मोजक्या षब्दांत मानवी मनाच्या गाभाऱ्यातील भावभावना चित्रित करते. गतिमान युगात यांत्रिक जीवनाच्या धकाधकीत मानवी मनाची होरपळ ते हेरतात व सूचकतेने, संयमाने, सूक्ष्मतेने त्या होरपळीचे चित्र उभे करतात. कातरवेळ, माहेर, गंधवार्ता, चुटपुट, अभोगी, यात्रा, कॅक्टस, अनवाणी आत्मा, मुक्ता, मुसळधार अशा कितीतरी अव्वल दर्जाच्या कथा अरविंद गोखले यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या विविध कथा नजराणा, जन्मखुणा, उन्मेश, तनुजा, जागरण, कमळण, मनोज, षुभा, चाहुल, व्रती, शपथ, शकुन्त, मंत्रमुग्ध, सूर्यमाळी, दागिना इ. कथासंग्रहातून वाचावयास मिळतात. कातरवेळ, मंजुळा, रिक्ता, यात्रा, अरविंद गोखले यांची कथा असे त्यांच्या निवडक कथांचे संग्रहही प्रकाशित झाले आहेत.

पु. भा. भावे यांच्या समर्थ लेखणीने उत्तम कथा मराठीस दिल्या. त्यांची भाषाषैली वेगवान आहे. प्रेमभावनेच्या अनेक सौम्य व गडद छटा त्यांनी मोठया सामथ्र्याने व कौषल्याने चित्रित केल्या आहेत. 'सतरावे वर्श' ही त्यांची गाजलेली कथा आहे. सावल्या, स्वप्न, मुक्ती, फुलवा, नौका, देव्हारा इ. त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. वैरी, स्वप्न, सीमेवर, दु:ख, रुप, पुतळा, पाशाण, प्रतारणा, संगम, घायाळ, चार मुठी तांदूळ, प्रकृती, मुक्ती, ध्यास, फाटलेले आकाष, पापी माणसे अशा काही चांगल्या कथांची देणगी पु. भा. भावे यांनी मराठीस दिली आहे. त्यांच्या कथेची समीक्षा करताना इंदुमती शेवडे म्हणतात की, "जीवनाविषयीच्या उदंड उत्साहाने भाव्यांना आयुश्याचे कानेकोपरे धुंडायला लावले आहे. गाडगीळांची कथा मर्यादित परिघात वावरते. ठराविक परिघाच्याच पण अनेक स्तरातून ती खोलवर पाहते व विविधता आणते. पण भाव्यांचे कथाविश्व विषाल आहे. समाजाच्या अनेक अंगांना, अनुभवाच्या अनेक पातळयांना भाव्यांच्या कथाविष्वाचा विस्तार छेदून जातो. त्यांच्या कथेत अनेक प्रकारचे प्रसंग घडतात. विविध प्रकारच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती येतात. या प्रसंगावर व व्यक्तीवर भावे अनेक कोनातून, अनेक स्तरांवरुन,

पुश्कळदा अनपेक्षित असा प्रकाश पाडतात. भावे जीवनातील चमत्कृती निवडतात. तसेच नाटय व काव्यही टिपतात. ही सगळी विविधता भाव्यांच्या समर्थ लेखणीला पेलून जाते".[११] त्यामुळेच पु. भा. भावे नवकथेच्या चतुस्तंभापैकी एक स्तंभ ठरतात.

व्यंकटेश माडगूळकर यांना माणदेशी वैराण माळावर दारिद्रयाची, दुःखाची, अज्ञानाची, अवहेलनाची जी स्पंदने जाणवली ती त्यांनी 'माणदेशी माणसं' मध्ये चित्रित केली. त्यांच्या या कथा बऱ्याच व्यक्तिचित्रात्मक असल्यातरी माणसाच्या मनाचे अनेक कंगोरे मराठी कथेत प्रथमच प्रकट झाले. ग्रामीण जीवनातील भोळेपणा, अंधश्रद्धा, बेरकी वृत्ती, कष्ट, हाल, यातना, लबाडी, याचना, लोभ, रंगेलपणा अशा अनेक बाजू व्यंकटेश माडगूळकरांच्या व्यक्तिचित्रात्मक सृष्टीत कथारुपाने आल्या. धर्मा रामोशी, रामा मैलकुली, येसा महारीण, कोंडीबा गायकवाड, षिदा चांभार, सखा महार, इ. उपेक्षितांना प्रा. श्री. म. माटे यांच्यानंतर व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेत स्थान मिळाले. त्यांच्या 'गावाकडच्या गोष्टी' अशाच एका आगळया वेगळया व नजरेआड राहिलेल्या जगाचे दर्शन घडवितात. 'हस्ताचा पाऊस', 'उंबरठा', हे त्यांचे आणखी काही कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. मायलेकरांचा मळा, लिंब, त्याची गाय व्यायली, न्याय, कलागत, आडिट, शाळा, मारुतराया, बाजाराची वाट, सव्हीस मोटार, जांभळाचे दिवस, सकाळची पाहुणी, अनवाणी अशा अनेक दर्जेदार ग्रामीण कथा माडगूळकरांनी लिहिल्या. त्यांची भाषाषैली साधी, सोपी, ग्रामीण असून अत्यंत मोजक्या शब्दात आशयघन अनुभव ते प्रकट करतात. पोकळी, वसाण, लग्न, जन्माच्या गाठी, हे पाप कुठं फेडू अशा काही नागरी जीवनावरील कथा व्यंकटेश माडगूळकर लिहिताना दिसतात. त्यांच्या कथेची समीक्षा करताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात की, "कोणत्याही माणसाचे व्यक्तिमत्व नुसतेच साधे सरळ असत नाही. पण माणसाच्या आवडीनिवडी, वृत्ती-प्रवृत्ती, आचार-विचार या दृष्टीने ते गुंतागुंतीचे असते. परंतु स्वभाव वैशिष्ट्यांचे अनेक सांधे बेमालूमपणे एकात एक मिसळून ते एकसंध व्यक्तिमत्व बनलेले असते. माणसांच्या अंतर्विष्वातील ही सांधेजोड, वेगळेपण, सुप्त जाणिवा यांची जाण माडगूळकरांना आहे. म्हणून केवळ चांगली, केवळ वाईट अषी पूर्वसुरींच्याप्रमाणे माणसे व्यंकटेश माडगुळकर चित्रित करीत नाहीत. माणसाचे हे जटील, गुंतागुंतीचे, वरवर सोपे साधे दिसणारे व्यक्तिमत्व साहित्यात प्रतीत करावयाचे असेल तर लेखकाजवळ सूक्ष्म निरीक्षणशक्ती हवी. माडगूळकरांच्याजवळ ती निश्चितपणे आहे. खेडेगावातला माणूस म्हटल्यानंतर त्यांची वागण्याची, बोलण्याची, इतकेच नव्हे तर चालण्याची उठ-बस करण्याची, एकंदरीत अनुभव घेण्याची, ती व्यक्त करण्याची पद्धत सुद्धा शहरी माणसांपेक्षा भिन्न अषी असते. माडगूळकरांनी प्रथम नेमके हेच लक्षात घेतले. म्हणूनच माणदेषाच्या छोटयाशा परिवारातील ग्रामीण जीवनाला आणि विशेषतः तेथील खेडूताला ते समर्थ, जिवंत उभा करु शकले. नुसते माणसाला ते जिवंतपणे उभे करतात असे नव्हे. तेथील प्राणी, पक्षी, निसर्ग, घरे, वाडे या सगळयांची ते तेवढयाच सामर्थ्यांने प्रचिती आणून देतात".[१२] त्यामुळेच नवकथेच्या चतुस्तंभापैकी ते एक स्तंभ आहेत.

जी. ए. कुलकर्णी, विद्याधर पुंडलिक, चि. त्र्यं. खानोलकर, वि. षं. पारगावकर, षरच्चंद्र चिरमुले, श्री. दा. पानवलकर, आनंद जातेगावकर, जयवंत दळवी, पु. षि. रेगे, श्री. ज. जोशी, पं. महादेव षास्त्री जोशी इ. कथाकारांनी या काळातील कथा विकसित करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. १९४५ते १९६० हा कालखंड असा आहे की ज्यात जुने कथाकारही आपल्या पद्धतीने लिहित होते. नवकथेबरोबरच जुनी कथाही विपुल प्रमाणात लिहिली जात होती. जुनी व नवे हे शब्द कालसापेक्ष असले तरी त्या त्या कथेतील प्रवृत्तीचे ते निदर्शक असल्यामुळे या लघुकथांच्या बाबतीत नवकथा व जुनी रुढ कथा हे शब्द रुढ होऊ लागले. या संदर्भात डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात की, "साधारणपणे १९१५, १९२५, १९३५, १९४५ ही वर्शे लक्षात घेतली असता असे दिसून येते की, दर दहा वर्शांनी मराठी कथेच्या क्षेत्रात नव्या दमाचे, नव्या उमेदीचे व नव्या दृष्टीचे लेखक उदयास आले आहेत आणि त्यांच्या प्रयत्नामुळे दर दहा वर्शांनी तिला नवे वळण लागले आहे. तिच्या अंगप्रत्यंगातून नवे तेज ओसंडू लागले आहे. १९१५ ते १९६० या कालखंडात नव्या कर्तृत्वषाली कथालेखकांना व नव्या प्रगतीपर प्रवृत्तींना प्रोत्साहन देण्यात 'मनोरंजन', 'यशवंत', किर्लोस्कर', 'सत्यकथा' व 'अभिरुची' या मासिकांनी घेतलेला पुढाकार निःसंषय प्रषंसनीय आहे. या तीन तपांच्या कालमर्यादेत मराठी लघुकथा स्थूलाकडून सूक्ष्माकडे,घटनाप्राधान्याकडून व्यक्तिदर्शन प्राधान्याकडे, चमत्कृतीकडून स्वाभाविकतेकडे या दिशांनी विकास पावत गेलेली आहे".[१३] १९४५ नंतर नवकथा व नवकाव्य या विषिश्ट संज्ञांची निर्मिती झाली. या संज्ञेतील 'नव' हे विशेषण कालसापेक्षता सूचित करणारे नव्हे तर मूल्यवाचक होते. बा. सी. मर्ढेकर व गंगाधर गाडगीळ यांनी मराठी साहित्यात जे नवतेचे परिवर्तन घडवून आणले ती एक कलाप्रवृत्ती असून तिच्या मूळाषी नवसंवदेनषीलता होती. मानवी जीवनव्यवहारात विविध स्तरावर होत असलेल्या मूलभूत स्वरुपाच्या परिवर्तनातून ही नवी संवेदनशीलता जन्माला येत होती. महायुद्धातील सर्वंकष विध्वंस, त्यातून प्रेरित झालेला जीवनमूल्यांचा पुर्नविचार औद्योगिकरणातून झालेला यंत्रसंस्कृतीचा जन्म, त्यातून निर्माण झालेले आर्थिक- सामाजिक प्रश्न, महानगराच्या प्रक्रियेच्या प्रारंभ इ. सांस्कृतिक संदर्भ, नवसंवेदनशीलतेच्या निर्मितीषी

कारणीभूत आहेत. जीवन वास्तवातील व्यामिश्रतेचे, माणसाच्या वाटयाला आलेले पोरकेपणा आणि त्यातून त्याच्या एकाकीपणाला येणारी नवी परिमाणे याचे दर्शन नवकथेत घडते.

**ग्रामीण कथा:-**

१८९७ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळा पडला होता. त्या संदर्भातील माहिती हरिभाऊ आपटे यांच्या वाचनात आली. मानवी जीवनाची झालेली वाताहत पाहून त्या करुणेपोटी हरिभाऊ आपटे यांनी 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा लिहिली. दुष्काळाने शेतकऱ्यांची वाताहत कशी झाली याचे चित्रण त्यांनी केले. ग्रामीण प्रदेश, ग्रामीण जीवन, ग्रामीण वातावरण, ग्रामीण माणूस चित्रित करायचा या हेतूने त्यांनी ही कथा लिहिली नाही. ग्रामीण भाषेचा तिला स्पर्श नाही. तिचे निवेदन नागरी भाषेत आहे. तरीही आज फोफावलेल्या गा्रमीण कथा विष्वाचा उगम म्हणून हरिभाऊ आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला' कडे पाहिले जाते.

वि. स. सुखटणकर यांनी ग्रामीण जीवनाविषयीच्या वाड्.मयीन जाणिवा मराठी साहित्यात प्रथम निर्माण केल्या. १९३१साली त्यांनी 'सहयाद्रीच्या पायथ्याशी' हा आपला आठ प्रादेशिक कथांचा संग्रह प्रसिद्ध केला. ग्रामीण जीवनाकडे वळण्याची त्यांची ही जाणीव तत्कालीन इतर कथाकारांपेक्षा वेगळी आहे. वि. स. सुखटणकर यांच्या बरोबरीने लक्ष्मणराव सरदेसाई यांनीही लक्षात येण्याजोगे गोमंतकाषी निगडित असे वाड्.मय लिहिले आहे. त्यांचे कल्पवृक्षांच्या छायेत, सागराच्या लाटा, वादळातील नौका, ढासळलेले बुरुज, इ. वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. जीवनातील नाटय, मानवी स्वभावाचे नमुने, स्त्री-पुरुश संबंध इ. पैलू त्यांच्या कथेतून दिसतात. वि. स. सुखटणकर यांनी दाखवलेल्या नव्या दिशेचा विस्तार, तिची निश्चिती साधण्याचे कार्य लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या कथेने केले.

१९४१साली 'उपेक्षितांचे अंतरंग' हा प्रा. श्री. म. माटे यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आणि ग्रामीण मराठी कथेत नवे धुमारे, नव्या जाणीवा निर्माण झाल्या. पं. महादेवषास्त्री जोशी यांच्या कथेनेही याच परंपरेत कथालेखन केले. 'महार माटे' म्हणून ज्यांचा उल्लेख करण्यात येतो त्या प्रा. श्री. म. माटे यांचे 'उपेक्षितांचे अंतरंग', 'माणुसकीचा गहिवर', 'भावनांची मांडणी' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कथासंग्रहाच्या नावावरुन त्यांच्या लेखनाचा कल स्पश्ट होतो. समाजशिक्षक प्रा. श्री. म. माटे यांनी दलितांमध्ये, उपेक्षितांमध्ये, समाजातील खालच्या थरात मिसळून त्यांचे जीवन, त्यांची सुखदुःखे, त्यांचे भोग, दारिद्रय, त्यांच्या समस्या माणुसकीच्या नात्याने समजून घेतल्या. सक्रिय राहून त्यांचे दुःख दूर करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला होता. त्यांचा अनाथ बन्सी, दरोडेखोर तरी प्रामाणिक पिऱ्या, मुक्याने मेलेली सावित्री, पिकासाठी टाहो फोडणारा भिवा, गंगाराम, सगाजी बहिरनाक, रामभरोशी ही माणसं आपल्या व्यक्तिमत्वासह उभी राहतात. प्रा. श्री. म. माटे यांच्या कथेवर भाष्य करताना डॉ. आनंद यादव म्हणतात की, ''हरिभाऊ आपटे यांच्यापूर्वी मराठी कादंबरी अस्तित्वात असूनही आधुनिक मराठी कादंबरीचे जनकत्व हरिभाऊंकडेच जाते, त्याच न्यायाने मराठी ग्रामीण कथेचे जनकत्व श्री. म. माटे यांच्याकडे जाते. माटे यांना ग्रामीण कथेचे हरिभाऊ म्हटले तर ठोकळ यांना 'फडके' म्हणावे लागेल. कारण ना. सी. फडके यांनी मराठी कथेला जे स्वरुप दिले, तेच स्वरुप ग्रामीण कथेला काही प्रमाणात ग. ल. ठोकळ यांनी दिले. माटे यांच्याबरोबरीने ते ग्रामीण कथा लिहित होते''[१४] डॉ. आनंद यादव यांचे हे विवेचन एका मर्यादित स्वीकारावे लागेल असे वाटते.

ग. ल. ठोकळ यांनी खेडेगावातील अज्ञान, तेथील रानदांडगेपणा, माणसा-माणसातील आणि गावातील हाडवैर, दादागिरी करणारे लोक, सुगी, पीक, शेतातील नाटयपूर्ण प्रसंग, खेडेगावातील सण-उत्सव, प्रेमप्रकरणे, भानगडी, भटक्या जमातींचे जीवन इ. आपल्या कथांचे विषय केले आहेत. विषयात विपुलता, विविधता आणि वैचित्र्य आणले.'कडू साखर' मधील कोल्हाटयांच्या खेळाचे वर्णन, 'दौलतजादा' मधील बकुळीच्या तमाशाचे वर्णन, 'गोफणगुंडया' मधील गोफणीच्या लढाईचे वर्णन अतिषय चित्रमय आहे. त्यांच्या या कर्तृत्वामुळे ग्रामीण कथेने मराठी वाड्.मयात चांगलेच मूळ धरले.

र. वा. दिघे यांना कल्पनारम्यतेचे आकर्शण आहे. त्यांच्या कथेत वाचकांच्या मनोभावना सुखविणारे कल्पनारम्य प्रसंग आहेत. कोकणी ग्रामीण माणसांची हलाखी, दारिद्रय, जीवनात उभारी येण्यासाठी त्यांनी केलेली मनस्वी धडपड यांचे अत्यंत तन्मयतेने त्यांनी चित्र रंगविले आहे. अनेक वेळेला त्यांनी खेडेगावच्या जीवनातील प्रश्न आपल्या कथांमधून हाताळले आहेत. पण हे प्रश्न हाताळताना त्यांनी सुधारणावादी दिशाही दाखविल्या आहेत. त्यांच्या कथा वाचताना वाचकाला त्यांच्या काव्यात्म वृत्तीचे प्रत्यंतर येते.

म. भा. भोसले यांनी ग्रामीण निष्ठा ठेवून ग्रामीण कथांचे लेखन केलेले आहे. त्यांची कथा एकपदरी झालेली आहे. ती क्वचितच जिवंतपणे संघर्श पकडते. जीवनाची अर्थपूर्णताही त्यांना सखोलपणे जाणवली नाही.

शंकर पाटील यांचे 'वळीव', 'भेटीगाठी', 'धिंड', 'ऊन', 'वावरी षेंग', खुळयाची चावडी', 'ताजमहालात सरपंच' इ. कथासंग्रह प्रकाशित झाले. काही विनोदी कथांचा अपवाद वगळता शंकर पाटील यांची कथा ग्रामीण माणसाच्या

जीवनातील दु:ख व्यक्त करते. खेडयातील मातीचा गंध असणारी, अनुभवाच्या मुषीतून जन्मलेली खेडवळ माणसे, ते प्रत्ययकारकपणे उभी करतात. शंकर पाटील यांची कथा ग्रामीण माणसाचे दु:ख व्यक्त करणारी कथा आहे. या कथेतील माणसं दु:खाने काळवंडून जातात. काही जेरीस येतात. पण त्याविरुद्ध पेटून उठत नाहीत. बंड पुकारत नाहीत. तक्रार करीत नाही. एवढे ते त्रस्त झालेले असतात. मग स्वत:षीच बोलतात.

द. मा. मिरासदार यांनी काही गंभीर कथा लिहिल्या असल्या तरी त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती मिष्किल, विनोदी कथालेखनाकडे आहे. या मिष्किलपणासोबतच ग्रामीण जीवनातील विसंगती, विक्षिप्तपणा, इरसालपणा इ. अनेक गोष्टी टिपण्याचे आणि त्यांचा परिणामकारक रीतीने आविश्कार करण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. गावातील चावडीवर, कट्ट्यावर, पारावर तंबाखू चोळत बसलेल्या मंडळींच्या गप्पांतून मिरासदारांची कथा रंगते. त्यांच्या कथेत गुंड, बेरकी, रिकामटेकडे आहेत. रिकामटेकडेपणा म्हणजे गप्पांना एक प्रकारचे आमंत्रण आहे. यातूनच मिरासदारांची कथा जन्माला येते.

उद्धव शेळके यांच्या ग्रामीण कथांमधून वऱ्हाड व विदर्भ हा परिसर साकार झाला आहे. वऱ्हाडी बोलीचा त्यांनी कथेतून केलेला उपयोग आणि कथेतून येणारी वास्तव व रेखीव वर्णने यामुळे त्यांची कथा वाचकांच्या मनाची चटकन पकड घेते. रणजित देसाई यांनी कोल्हापूर जिल्हयातील चंदगड भागातील व सीमावर्ती डोंगरी मुलूखातील लोकजीवनाचे, प्राणीजीवनाचे, निसर्गाचे चित्र रेखाटले आहे. बदलती खेडी, बदलती ग्रामसंस्कृती, कृषी संस्कृती हे रणजित देसाईच्या कथांचे विषय आहेत. बाबा पाटील यांच्या कथा ग्रामीण जीवनाची वास्तव अभिव्यक्ती करणाऱ्या आहेत. ग्रामीण माणसाचे कुंटुब, षेती, निसर्ग या सर्वांषी निगडित असलेले भावबंध ते आपल्या कथेत चित्रित करतात. मधु मंगेश कर्णिक यांची कथा आपल्याला कोकणच्या पार्श्वभूमीवर नेते आणि तेथील जीवनाचे दर्शन घडविते. हे जीवन विविध रंगांनी नटलेले आहे. त्यांच्या कथातील व्यक्तिरेखा आपल्या मनाची पकड घेतात.

रा. रं. बोराडे यांनी पेरणी, मळणी, नातीगोती, बोळवण इ. कथासंग्रहाच्या माध्यमातून मराठवाडयातील दुष्काळग्रस्त परिसर चित्रित केला आहे. खेडयातील स्त्रियांची होणारी कुचंबणा, ओढाताण, मुस्कटदाबी, मूकवेदना, सोशिकता आणि दु:खाचं रिंगण यांचे चित्रण रा. रं. बोराडे यांनी मोठया आत्मियतेने केले आहे.

आनंद यादव यांनी शेतात राबणारी, कष्ट करणारी, शेतमजूर अशा स्त्री-पुरुशांची भावचित्रे आपल्या कथेतून रंगविली आहेत. गरीब, लहानसा शेतकरी, त्याचा ओढग्रस्तीचा संसार, तरीही माणसांच्या नात्यांची जपली जाणारी मायाममता, षेरडा-कोकरा-बैलांवरील लळा, शेतावरील आत्यंतिक निष्ठा, मजुरांची हलाखी, त्यांनी दैन्याषी कवटाळीतच जपलेली श्रद्धा, मातीखालच्या मातीतला जिव्हाळा, हिरवं लेणं ल्यालेलं पिकपाणी, मानवी मन यांचे भावरम्य दर्शन त्यांनी घडविले आहे. या कृषीसंस्कृतीत एकटे, एकाकी, उपेक्षित जीवन जगत असताना सांभाळलेले लोकाचार, जपलेली माणुसकी, त्यांचे सणवार, जत्रा-यात्रा, मोडका संसार सांभाळणाऱ्या स्त्रियांची दु:खं, त्यांच्या मनातील काहूर, द्वंद्व यातील आनंद यादव यांनी चित्रित केलेला षोकाकुल भाव प्रत्ययाला येतो.

सखा कलाल, प्रा. चंद्रकुमार नलगे, चारुता सागर, द. ता. भोसले खेडे आणि खेडयाषी निगडित जीवन त्यांच्या कथेतून प्रभावीपणे अवतरते.

भास्कर चंदनशिव यांचे मरणकळा, जांभळढव्ह, अंगारमाती हे कथासंग्रह प्रसिद्ध असून बीड, उस्मानाबाद जिल्हयाच्या वैराण, दुष्काळी परिसराचे चित्रण ते आपल्या कथेतून करतात. दुष्काळाचा वणवा वाढवणारा आणि तेथील प्राणीजीवनालाच अगतिक बनविणारा तेथील निसर्ग त्यांच्या कथेत येतो. प्रखर उन्हाने खुरटून टाकलेली आयुश्ये जगत भोगत तगून राहणारी माणसं, अंगारमातीने करपून टाकलेल्या माणसांची मानसिकता ते समर्पकपणे चित्रित करतात. दीनदलितांच्या जीवनाचा केला जाणारा पाचोळा, दलित स्त्रियांवरील अत्याचार, या सर्वांच्या पाठीमागे असणारी अर्थव्यवस्था या सर्वांचे चित्रण त्यांच्या कथेत येते.

या शिवाय शंकर खंडू पाटील, मधू कुलकर्णी, द. का. हसमनीस, बा. भ. पाटील, मनोहर तल्हार, हमीद दलवाई, सरोजिनी बाबर, मुकुंद गायकवाड, चंद्रकांत भालेराव, व. बा. बोधे, रंगराव बापू पाटील, अनंत पाटील, बा. भ. पाटील, बाबाराव मुसळे, मोहन पाटील, गणेष धांडगे, वासुदेव मुलटे, प्रतिमा इंगोले, वसंत केशव पाटील, डॉ. श्रीराम गुंदेकर, बा. ग. केसकर, गणेष आवटे, आप्पासाहेब खोत, देवदत्त पाटील, अनुराधा गुरव, लुब्धा पाटील, राजन गवस, सदानंद देशमुख, ललिता गादगे इ. ग्रामीण कथाकारांनी ग्रामीण कथा आपापल्या परीने समृद्ध केली आहे. वर्तमानात आणि भविश्यात ग्रामीण जीवनात झपाटयाने बदल होणार आहेत. यंत्रयुग, माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आता खेडोपाडी पोहोचत आहे. शहराषी आदान-प्रदान वाढली आहे. शिक्षणाचे प्रमाणही वाढले आहे. ग्रामीण माणूस आता बऱ्यापैकी सजग झाला आहे.

**दलित कथा:-**

स्वातंत्र्योत्तर काळात ज्या नव्या वाड्.मयीन जाणिवा व प्रवृत्ती मराठी साहित्यात आपल्या खुणा उमटवू

लागल्या. त्यात दलित साहित्याचे स्थान अतिषय महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाने दलित अनुभवाला जाग आली. शतकानुशतकांच्या मौनाला वाचा फुटली. पोथीनिष्ठ अंधश्रद्धा, देव व दैवषरणता यांनी तुडविलेले मानवी मन नव्या विज्ञाननिष्ठ हुंकारांनी सजग झाले. दलित कथेच्या प्रेरणा आणि प्रवृत्तीची पार्श्वभूमी विषद करताना प्रा. चंद्रकुमार नलगे, डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात की, "जीवन जाणिवा कोंडीतून मुक्त होऊन नवा आशय आविश्कृत होऊ लागला. हा नवा आत्मशोध होता. ही नवी सांस्कृतिकता होती. अस्मितेचा हा नवा उद्गार होता. याचेच नाव दलित साहित्य. भारतीय संस्कृतीच्या तळाशी पेटलेले हे अग्निकुंड आहे. दलित कथा ही या अग्निकुंडातील एक ठिणगी आहे. मराठी कथावेलीला आलेले ते एक रसरषीत फळ आहे".[१५] दलित कथा सामाजिक चळवळीतून उदयाला आलेली आहे. महायुद्धानंतरची कथा मध्यमवर्गीय पांढरपेशा लोकांनी घडविली होती. या कालखंडात उपेक्षितांचे, दलितांचे अंतरंग उकलून दाखविण्याच्या प्रेरणेने प्रा. श्री. म. माटे, 'बन्सिधरा! तू कुठे रे जाशील?' ही कथा लिहिली. ज्या कथेमुळे मराठी कथेचा वाचक एका वेगळया जगात आला, तेथील ओंगळ जीवन आणि पशूपातळीवर जगणारी माणसे दिसली. हे जग मध्यमवर्गीय, पांढरपेषा वाचकांच्या ओळखीचे नव्हते. उपेक्षितांच्या वेदना प्रा. माटे यांनी जाणून घेतल्या. व्यंकटेश माडगूळकरांसारख्या काही मराठी कथाकारांनी दलितांचे जीवनचित्रण आपल्या कथेत करण्याचा प्रयत्न केला.

३१जानेवारी १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली 'मूकनायक' हे पाक्षिक सुरु झाले. आपल्या लेखनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या प्रष्नांना वाचा फोडण्यास सुरुवात केली. यात गंभीर, विद्वत्तापूर्ण लेखन होते. तसेच दलित चळवळीला पुढे घेऊन जाण्यासाठी त्या त्या वेळच्या प्रष्नांवर केलेले लेखनही होते. बाबासाहेबांनी १९४६ मध्ये पीपल्स एज्युकेषन सोसायटीची स्थापना केली आणि मुंबईमध्ये सिद्धार्थ कॉलेज सुरु केले. वेगवेगळया नियतकालिकांतून दलितांचे साहित्य निर्माण होत होते. सिद्धार्थ कॉलेजमधून बाहेर पडलेल्या पहिल्या पिढीतील तरुण लेखकांनी १९५० साली 'सिद्धार्थ साहित्य संघा' ची स्थापना केली. १९५३ मध्ये 'महाराष्ट्र दलित साहित्य संघा' ची स्थापना झाली. १९६७साली औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयात 'मिलिंद साहित्य परिशदे' ची स्थापना झाली. मिलिंद साहित्य परिशदेच्या प्रेरणेने 'अस्मितादर्श' हे नियतकालिक सुरु झाले. दलित साहित्याच्या चळवळीत हे नियतकालिक महत्वपूर्ण ठरले.

या संदर्भात डॉ. अंजली सोमण म्हणतात की, "वर्ण-व्यवस्थेने दलितांवर केलेल्या अन्यायाविरुद्ध संघर्श करण्यासाठी जे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले, त्यांचाच आधार घेऊन आरंभकाळातील ही दलित कथा उभी राहिली. मराठी साहित्याच्या क्षेत्रात ज्यांची नावे माहीतही नाही अशा धों. द. थोरात, दौलत जाधव, गोविंद रामटेके, रघुनाथ घानकुटकर इ. दलित लेखकांनी 'जनता' साप्ताहिकातून सुरुवातीच्या काळात कथालेखन केले आहे.".[१६] अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल हे दलित कथेचे षिल्पकार आहेत. योगिराज वाघमारे, वामन होवाळ, दादा गोरे, पुंडलिक धोंगडे, केशव मेश्राम, अषोक लोखंडे, अर्जुन डांगळे, दया पवार, माधव कोंडविलकर यांनी दलित कथेला एक दिशा, एक गती दिली. अमिताभ, सुधाकर गायकवाड, योगेंद्र मेश्राम इ. दलित कथाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व प्रेरणा प्रमाण मानून कथालेखन करत आहेत.

**स्त्रीवादी कथा:-**

मराठी लघुकथेचा प्रारंभ हरिभाऊ आपटे यांच्यापासून म्हणजे साधारणतः इ.स. १८८० पासून झाला असला तरी स्त्रियांनी कथालेखनास बरीच उषीरा सुरुवात केली. स्त्रियांच्या कथालेखनात जीवनदर्शनाच्या आणि वास्तववादी लेखनाच्या प्रेरणा होत्या. या जीवनवास्तवाचे चित्रण काही कथालेखिका कलात्मक पद्धतीने करु षकल्या. काहींच्या कथा सरधोपट, निवेदनात्मक आणि बोधवादी पद्धतीच्या बनल्या. या कथालेखिकांनी जे जीवन पाहिले, अनुभवले, ऐकले त्यातील दुःखे या कथालेखिकांनी चित्रित केली. आपल्या आकलनशक्तीनुसार या दुःखावरील उपायांचेही दिग्दर्शन केले. आधुनिक मराठी वाड्.मयाच्या प्रारंभकाळात स्त्रिया स्वयंपाकघर-माजघराच्या चैकटीत बांधल्या गेलेल्या होत्या. संसार करणे, मुलेबाळे सांभाळणे ही त्यांची आद्य कर्तव्ये होती. स्वयंपाकघर-माजघराच्या चैकटीतून जेवढे मर्यादित जग दिसत होते त्यांचे प्रतिबिंब या काळातील त्यांच्या कथासाहित्यात उमटले आहे.

स्त्रियांचे कथालेखन त्या काळातील विविध नियतकालिकांतून प्रकाशित होऊ लागले होते. स्त्रियांच्या कथेचा इतिहास सांगाताना डॉ. अंजली सोमण लिहितात, "शांताबाई या लेखिकेने लिहिलेली 'बिचारी आनंदीबाई' (मासिक मनोरंजन, नोव्हें, डिसें, जोड अंक १८९६) ही कथा म्हणजे स्त्रीने लिहिलेल्या उपलब्ध कथातील पहिली कथा आहे. स्त्रियांचे कथालेखन जरी १८९६ मध्ये सुरु झालेले असले तरी स्त्रीने लिहिलेल्या कथांचा संग्रह प्रसिद्ध होण्यास थेट १९१५साल उजाडले. लक्ष्मीतनया (लक्ष्मीबाई अभ्यंकर) यांचा 'सद्यस्थिती' हा तो कथासंग्रह. १८८५ ते १९२० या कालखंडात लेखिकेचा म्हणून प्रसिद्ध झालेला तो एकमेव संग्रह आहे. 'बिचारी आनंदीबाई' या शीर्शकातून

त्या काळातील स्त्रीचे दुःख व तिची परवषता जाणवू लागते".[१७] काशीबाई कानिटकर, गिरीजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, यशोदाबाई भट यांनी या कालखंडात नियतकालिकांतून कथालेखन केले व पुढे त्यांचे याच पूर्वप्रकाशित कथांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. १९३० ते १९४० या कालखंडात कमलाबाई टिळक, विभावरी शिरुरकर आणि कुसुमावती देशपांडे या तीन वेगळया वाटेने जाणाऱ्या कथालेखिकांनी वेगळया कथा मराठी लघुकथेला दिल्या. मालतीबाई दांडेकर, कमला फडके, मुक्ताबाई दीक्षित, आनंदीबाई जयवंत, आनंदीबाई किर्लोस्कर, शांता शेळके, षषिकला आळंदकर, सुषिला षिंदे, इंदिराबाई पेंडसे, कमलाबाई बंबेवाले, यमुना केळकर, कुमुदिनी प्रभावळकर, राधाबाई मुळीक, स्नेहलता वैद्य, रजनी गुहागर, लीला देशमुख, शांता नाशिककर, वारुबाई शेवडे, इंदिरा गोरे, वसुमती धारकर या लेखिकांनी कथालेखन करुन मराठी लघुकथेत भर घातली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सुशिक्षित पांढरपेषा वर्गाचा भ्रमनिरास झालेला होता. फाळणीमुळे स्वातंत्र्याचा आनंद मिळू षकला नाही. वाढती लोकसंख्या, बेकारी, शहरीकरण, यंत्रयुग या स्वातंत्र्यपूर्व काळातील समस्यांनी उग्र रुप धारण केले होते. अशा निराष अवस्थेत रंजनवादी साहित्याची निर्मिती विपुल प्रमाणात होत होती. नाटक, आकाषवणी, नियतकालिके ही मनोरंजनाची साधने होती. या काळातील नियतकालिकांनी-मासिकांनी स्त्रियांच्या कथेला प्रसिद्धी दिली. महिलांचा नवा वाचकवर्ग मिळाला. यातून कथालेखिकांना उत्तेजन मिळाले. अनेक नवनवीन लेखिका लिहू लागल्या. अवतीभोवतीच्या स्त्रीसमस्यांना, प्रेमप्रकरणांना, भावनांना शब्दरुप देऊ लागल्या. कुटुंब, स्वयंपाकघर, मुलंबाळं यात अडकलेली संसारी स्त्री बाहेरचे विश्व पाहू लागली. गायन, खेळ, चित्रकला, वाचनासारखे स्वतःचे छंद जोपासू लागली होती.

कमला फडके, योगिनी जोगळेकर, सुमती क्षेत्रमाडे, स्नेहलता दसनूरकर, सुषीला चिकडे, गिरीजा कीर, शैलजा राजे, शकुंतला गोगटे, कुमुदिनी रांगणेकर, विजया वाड इ. कथालेखिकांच्या लेखनातून स्वप्नरंजनात्मक जीवनचित्रण येते. बहुतेक लेखिकांनी प्रीतीकथेचे लेखन केले आहे. तरुण तरुणींची भेट, परिचय, सहवास, प्रियकराने पाठ फिरवणे इ. विषय या कथेतून आले आहेत. वसुंधरा पटवर्धन, इंदिरा संत, सरोजिनी बाबर, शिरीष पै, लीला श्रीवास्तव, सुधा नरवणे, सरिता पदकी, तारा वनारसे, ज्योत्स्ना देवधर, विजया राजाध्यक्ष, पद्मिनी बिनिवाले, पद्मजा फाटक, रोहिणी कुलकर्णी, सुनिती आफळे, आषा बगे, वसुधा पाटील, अजिता काळे, दीपा गोवारीकर, सुधा सोमण, उशा दातार, निर्मला देशपांडे, निलमगोऱ्हे, स्नेहसुधा कुलकर्णी, आषा कर्दळे, रेखा बैजल, वीणा देव, माधवी देसाई, आश्विनी धोंगडे, अनुराधा वैद्य, अरुणा ढेरे आदींनी कथालेखन करुन मराठी कथेला योगदान दिले.

गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर यांनी स्वतंत्र भूमिका घेऊन कथालेखन केले. सानिया यांचे दिशा घराच्या, ओळख, वलय, परिणाम, शोध, प्रतिति, खिडक्या, प्रयाण इ. कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. सानियाच्या कथांमधून लग्नसंस्थेची चैकट लवचिक झाल्याची जाणीव, स्त्रीचे शरीरनिष्ठ अनुभव, विवाहानंतर अपरिहार्यपणे स्त्रीच्या वाटयाला येणारे मातृत्व यांच्याबद्दलची जाणीव येते.

गौरी देशपांडे यांचे 'आहे हे असे आहे', 'एकेक पान गळावया' हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. स्वयंभू, मुक्त अषी स्त्री गौरी देशपांडे यांच्या कथेत येते. ही स्त्री तिच्या इच्छा-आकांक्षा, सहजप्रेरणा प्रमाण मानून जगते. स्वतःषी प्रामाणिक असणे हा तिचा जीवनविषयक दृष्टीकोन असतो. म्हणूनच नीती-अनीतीच्या कल्पना, समाजभय तिला जाणवत नाही. स्वतःकडे आणि भोवताली बघण्याची तिची दृष्टी निखळ, पारदर्शी असल्याचे जाणवते. स्वतःमधील गुण-दोश अतिषय उत्कटतेने जगते. स्त्री-पुरुश संबंधातील ओढ, आकर्शण यांचे चित्रण त्यांच्या कथेमध्ये येते. वासनातृप्तीसाठी पुढाकार घेणारी धीट स्त्री त्यांच्या कथेमध्ये दिसते.

प्रिया तेंडुलकर यांचे 'ज्याचा त्याचा प्रश्न' 'असं ही', 'जन्मलेल्या प्रत्येकाला', 'जावे तिच्या वंशा' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथेतून लग्नसंस्थेबद्दल भाष्य येते. वैवाहिक जीवनातील स्त्रीचे उद्ध्वस्तपण, घटस्फोट इ. प्रष्नांचा विचार त्यांच्या कथेत येतो. सानिया, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर यांच्या बरोबरीने छाया दातार, मेघना पेठे, उर्मिला शिरुर, अंबिका सरकार आदी लेखिकांनी स्त्रीवादी कथालेखन केले आहे.

याशिवाय दलित कथेमध्ये उर्मिला पवार, ग्रामीण कथेमध्ये प्रतिमा इंगोले, ललिता गादगे, विज्ञानकथेमध्ये रेखा बैजल, माधुरी शानभाग, विनोदी कथेमध्ये षकुंतला परांजपे, शकुंतला बोरगावकर, इंद्रायणी सावकार इ. कथालेखिकांनी मराठी कथेला महत्वपूर्ण योगदान दिले आहे. स्त्रियांच्या कथांवर प्रतिक्रिया व्यक्त करताना इंदुमती शेवडे म्हणतात, "पाश्चात्य स्त्रीमुक्ती साहित्यात स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्य, विवाहादी संस्थांना नकार, मातृत्व स्त्रीच्या मर्जीवर, स्त्री पुरुश समानता हे ठळक विशेष सांगता येतील. गौरी देशपांडे व सानिया यांचे अपवाद वगळता विवाहबाहय संबंधांचा पुरस्कार करायला भारतीय स्त्री अजून बिचकते. आषा बगे, रोहिणी कुलकर्णी या भीतभीत पाऊल टाकतात. पण सर्वसाधारण लेखिकांनी स्त्रीची जाणीव अधिक धारदार व जागृत केली. भारतीय संयमित संस्कृतीत त्याची पाळंमुळं खोलवर रुजलेली आहेत. त्यामुळे इथल्या स्त्रीमुक्ती साहित्यातून अजून निश्चित

स्पश्ट दिशा सापडल्याचे आढळत नाही".१८ मराठीत कथेलेखिकांच्या कथेत लग्न, स्त्रीचे शरीर, स्त्रीचे मन, स्त्रीची नोकरी इ. चे चित्रण आले आहे. बालविवाह, विधवाविवाह, पुनर्विवाह, परित्यक्त्या, विधवा, निःसंतान स्त्रियांची दुःखे, वर निवडण्याचे स्वातंत्र्य नसणे, नावडता पती मिळणे, अरसिक पती मिळणे, पतीचे विवाहबाह्य संबंध असणे इ. विषयांवर कथालेखन झाले आहे. त्याशिवाय पती, प्रियकर, मित्र, ऑफिसमधील बॉस, प्रेम, निखळ मैत्री, विवाहबाह्य संबंध, कुमारी माता, लैंगिक सुख, इ. विषयांवरही कथालेखन झाले आहे.

**आदिवासी कथा:-**

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. साहित्य समाजाला प्रेरणा देत असते. ज्या ज्या देषात क्रांती झाली त्या त्या देषात प्रेरणादायी साहित्याची निर्मिती झाली. पारंपरिक मराठी साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, इ. साहित्यप्रवाहांच्या माध्यमातून त्या त्या समाजघटकांचे प्रबोधन झाले व होत आले आहे. आदिवासी साहित्यही समाजाचे प्रबोधन करत आहे.

भारतीय समाज एक असला तरी त्यात अनेक जाती आहेत. प्रत्येक जातीच्या समस्या वेगवेगळया आहेत. प्रत्येक कुटुंबाची, प्रत्येक व्यक्तीची वेगळी कथा आहे. व्यथा आहे. पारंपरिक मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदिवासी साहित्याचा जन्म झाला. ग्रामीण साहित्यिकांनी कृषी संस्कृतीचे चित्रण केले. दलित साहित्यकांनी गावकुसाबाहेर राहणाऱ्या वर्णव्यवस्थेत दबलेल्या दलित समाजाचे चित्रण केले. त्याचप्रमाणे आदिवासी साहित्यिकांनीसुद्धा आदिवासी बांधवाचे चित्रण केलेले आहे.

लग्न, उत्सव इ. वेळी उस्फूर्तपणे म्हटल्या जाणाऱ्या कवनांतून आदिवासींचे सुख-दुःख, राग-आनंद, समाधान, आषा-आकांक्षा, भाव-भावना व्यक्त होत होत्या. परंपरागत गोष्ट सांगणाऱ्यांकडून रात्र-रात्रभर चालणारी कथा, जीवनाचे दर्शन आणि मनोरंजन करणारी गावदिवाळीची नाटकं, असंख्य वाद्ये, बासरीचा सूर, इ. माध्यमातून आदिवासी स्वतःला आविश्कृत-अभिव्यक्त करतो. आदिवासी लोकांबद्दल व आदिवासी साहित्याबद्दल कोल्हापूर (इ.स.२०००) येथील विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन भाशण करताना वाहरु सोनवणे म्हणतात की, "काही षिकलेले आदिवासी तरुण नोकरीतच रमून समाजाबाबत उदासीनता दाखवत असले तरी काही तरुण-तरुणी त्याच्या पलीकडे जाऊन समाजाबद्दल गांभीर्याने विचार करु लागले आहेत. भारतीय साहित्यात आपले प्रतिबिंब कुठे दिसते का ते पाहत आहेत. षिकलेला आदिवासी साहित्यात नायकत्वाची आपली भूमिका षोधू लागला आहे. साहित्यात, उमटलेले जे प्रतिबिंब आहे ते आदिवासींना न्याय देणार आहे का? अशा प्रकारची नजर ठेवून नव्या पिढीचा षिकलेला तरुण आपली अस्मिता षोधून, स्वतःच आपल्या हातात लेखणी घेऊन लिहू लागला आहे. आणि आपल्या दुःखांना, विद्रोहाला तसे लिपीबद्ध करतो आहे".[१९] डॉ. गोविंद गारे, भुजंग मेश्राम, नेताजी राजगडकर, कुंडलिक केदार, चामुलाल गठवा, वीरसिंग पाडवी, विश्राम वळवी, कृष्णकुमार चांदेकर, ॲड. मोरे, सविता आत्राम, संघजा मेश्राम, लक्ष्मण टोपले, दषरथ मडावी, बळवंत वळवी, बाबूराव मडावी, विनायक तुमराम, नजुबाई गावित, उशा किरण आत्राम, कुसुम आलाम, इ. अनेक आदिवासी साहित्यिक, कलावंत, समीक्षक आदिवासी साहित्य चळवळीत आपले महत्वपूर्ण योगदान देत आहेत. दुर्गा भागवत, सुदाम जाधव, इंदुताई परुळेकर, अनुताई वाघ, दीनानाथ मनोहर, जगदीष गोडबोले, कॉ. शरद पाटील, डॉ. गेल ऑमव्हेट इ. बिगर आदिवासी साहित्यिकांनी आदिवासी चळवळ पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

आदिवासी कथेवर प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. रा. गो. चवरे म्हणतात की, "आदिवासी कथा अल्यल्प प्रमाणात लिहिलेली दिसते. मात्र ती अस्सल देशी आहे. एका वेगळया पर्यावरणात जगणारा येथील माणूस ग्रामीण आणि दलित कथेतील माणसापेक्षा भिन्न आहे. त्याचे वेगळे प्रादेशिक जीवन, वेगळी बोली आणि संस्कृती आहे. शहरी संस्कृतीला, सुखसौश्टवाला आचवलेला हा माणूस खऱ्या अर्थाने भूमिपुत्र आहे. तो या भूमीचा मुळ रहिवासी आहे. पांढरपेषा समाजाषी जेव्हा जेव्हा त्याचा संबंध येतो तेव्हा तेव्हा तो षोशणाचा बळी ठरतो. त्याचे केलेले षोशण ह्रदयाचा ठोका चुकविणारे आहे. दैन्य आणि अज्ञान यांनी आधीच खस्तावलेला हा माणूस अंधविष्वास नि परंपरेच्या खोल गर्तेत रुतलेला आहे. त्याच्या जीवनवेणा आदिवासी कथेत दिसून येतात. गोविंद गारे, उशा किरण आत्राम, बाबाराव मडावी, मारोती कुडमेथे, विनायक तुमराम, माधव सरकुंडे इ. लेखकांनी या जीवनाचा वेध घेतलेला आहे. हे लेखकही आदिवासी आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखनात वास्तवाचे गाढ आकलन दिसून येते".[२०]

पंढरीनाथ तामोरे यांचे 'वाल्या', 'हिरवा कातळ', आणि 'तांडेल' असे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून त्यांच्या कथेला त्यांच्या सामाजिक चळवळीचे व कार्याचे अंग आहे. त्यामुळे त्यांची कथा सामाजिक प्रबोधनाची धार घेऊनच प्रकट होते. त्यांच्या कथेची समीक्षा करताना डॉ. सुमनोहर म्हणतात की, "तामोरे यांच्या कथेतून सामाजिक आशय प्रकट होत असून त्यातील घटना, प्रसंग व पात्रे सामाजिक दृष्टीकोनातूनच साकार होतात. तामोरे हे ज्या समाजातून पुढे आले तो कोळी समाज अजूनही प्राथमिक पातळीवर जगताना दिसतो. परंतु अलीकडे ज्या काही

सुधारणा या समाजात घडून आल्या आहेत किंवा घडून याव्यात या दृष्टीने व उदात्त हेतूने लेखकाने उत्कट स्वरुपाच्या कथा लिहिल्या आहेत. त्या आत्मानुभूतीतून साकार झाल्याने त्याला वास्तवतेचा सहजस्फूर्त स्पर्श झाला आहे. ठाणे, पनवेल, डहाणू याठिकाणच्या मच्छिमार, कोळी, आदिवासी लोकांचे स्वभाव, त्यांची संवेदनशीलता, त्यांची जिद्द व कश्टाळूपणा याचा अस्सल प्रत्यय आणून देण्यासाठी लेखकाने पात्रानुगामी बोलीभाषेचा सहज वापर केला आहे. त्यामुळे एका अनोख्या बोलीचा गोडवा वाचक मनाला जाणवतो".[२१] जयवंत वैती यांचा 'भांग-उधाण' हा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. जयवंत वैती यांनी आपल्या कथेतून कोळी, आगरी, आदिवासी समाजातील लोकांच्या दैनंदिन जीवनातील सुखदु:ख आणि चढउतार रेखाटले आहेत. कुठलाही अभिनिवेष, आक्रोष किंवा सांकेतिक दृष्टीकोण न बाळगता त्यांनी आपली कथा साकार केली आहे. कथेची मांडणी लवचिक करुन अनुभव साध्या-सरळ पद्धतीने व प्रभावी भाषेत मांडलेला आहे. अस्सल बोलीभाषेतून कथेतील पात्रे साकार करुन आदिवासी बोलीचा वाचकांना परिचय घडवून आणला आहे.

शंकर सखाराम यांच्या कथेत षिकार करणारे, दरिद्री, भुकेले कातकरी व त्यांची धडपड दिसते. कश्टाची कामे करुन खायला पोटभर अन्न मिळत नाही. या दु:खाचे चित्रण येते. त्यांनी आदिवासी समाजातील माणसाच्या जगण्याच्या पद्धतीचे आपल्या कथेतून प्रकटन केले आहे. त्यांना आदिवासी समाजात जाणवलेले अज्ञान, अंधश्रद्धा, दैन्य, दु:ख व दारिद्रय यांचे यथार्थ चित्रण केले आहे.

प्रा. श्री. म. माटे, शांताराम, वामन चोरघडे, मधु मंगेश कर्णिक, आबाजी नाना पेडणेकर, दे. षि. दुधलकर, बाबुराव बागूल, अनंतराव पाटील, दादासाहेब मोरे या प्रस्थापित ग्रामीण, दलित कथाकारांनी आपल्या कथेतून आदिवासी समाजातील एखादी व्यक्ती, घटना किंवा प्रसंग घेऊन त्यांचे रंजक, भडक तर कधी नाटयपूर्ण रीतीने रेखाटन केले आहे. या लेखनात काही प्रमाणात करुणा, सहानुभूती आहे. आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार अजूनही म्हणावा तितका झालेला नाही. जसजसा हा प्रसार होत जाईल तसतसे आदिवासींचे कथाविश्व समृद्ध होत जाईल यात षंका नाही.

**विज्ञान कथा:-**

विज्ञानातील वेगवेगळया संकल्पना आणि शोध यांचा उपयोग विज्ञानवादी साहित्यात केला जातो. ज्यूल्स व्हर्न याने 'ट्वेंटी थाऊजंड लिग्ज अंडर द सी', 'अराउंड द वल्र्ड इन एटी डेज' इ. कादंबऱ्यातून अंतरिक्षातील प्रवास, पाणबुडया, चंद्राभोवती फिरणारे अंतरिक्षयान इ. गोष्टी मांडलेल्या आहेत. एच. जी. वेल्स, आर्थर सी. क्लार्क, आयझॅक आझिमोव्ह इ. नी चांगल्या प्रकारचे विज्ञानकथा लेखन केले आहे. मराठीत १९६० नंतर मराठी विज्ञान कथालेखन झाले. द. चि. सोमण, द. पा. खांबेटे, गजानन क्षीरसागर, यशवंत रांजणकर, नारायण धारप, इ. लेखकांनी विज्ञानकथांचे लेखन केले.

जयंत नारळीकर यांचा 'यक्षांची देणगी' हा विज्ञान कथासंग्रह आहे. यातील कथा ही भविश्यकालीन वैज्ञानिक प्रगतीवर आधारीत आहे. पृथ्वी या ग्रहाव्यतिरिक्त इतरत्र कुठे जीवसृष्टी असेल का? याचा अभ्यास वैज्ञानिकांना नेहमीच आकर्शित करत आहे. तसा अजून शोध लागलेला नाही. जयंत नारळीकर यांच्या कथा वैज्ञानिक असल्यातरी मानवी भावना, मानवाची स्वार्थी वृत्ती, आक्रमक वृत्ती, महत्वकांक्षा इ. प्रवृत्तींवर प्रकाश टाकतात. त्यांच्या कथेत भयगंडता नाही. सर्वसामान्य माणसाला विज्ञानाविषयी ज्ञान प्राप्त व्हावे हा जयंत नारळीकर यांचा हेतू आहे. या संदर्भात जयंत नारळीकर म्हणतात की, "विज्ञानकथा मनोरंजक आणि विज्ञानाच्या दृष्टीने उद्बोधक असावी. सध्या माहीत असलेल्या विज्ञानावर किंवा त्यात स्वत:च्या कल्पनाशक्तीने भर घालून उद्याच्या विज्ञानाचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न असावा. आर्थर क्लार्क या विज्ञान कथालेखकाने तीन दषकांपूर्वी उपग्रहावरुन टेलिव्हीजन प्रक्षेपणाची कल्पना मांडली होती. हा उपग्रह पृथ्वीच्या विषिश्ट भागावर तरंगत असेल अशा तऱ्हेने सोडण्यात यावा अषी त्यात योजना होती. ती साकार झालेली आज आपण पाहतो. फ्रेड हॉयेल यांनी आपल्या 'जीम ठसंबा ब्सवनक' या पहिल्या विज्ञान कादंबरीमध्ये अंतराळात, ताऱ्यांच्या दरम्यानच्या विस्तीर्ण प्रदेषात 'जिवंत' कृष्णमेघ असल्याची कल्पना केली होती. गेल्या पाच-दहा वर्षात अशा प्रदेषात जीवनाचे मूल घटक म्हणून समजले जाणारे रासायनिक रेणू सापडत आहेत. प्रख्यात विज्ञानककथाकार रे बॅड्रबरी यांनी एका भाशणात असे प्रतिपादन केले आहे की माणसाचे विसाव्या शतकातले जीवन म्हणजे एक प्रत्यक्ष घडलेली विज्ञान कथा आहे. शंभर वर्शापूर्वीच्या आपल्या पूर्वजांना आपले आजचे जीवन म्हणजे एक विज्ञानकथा वाटले असते. दिवसेंदिवस विज्ञानाच्या विविध क्षेत्रात लागणारे शोध, त्यांचे घडलेले आणि संभाव्य दुश्परिणाम, शास्त्रज्ञांमधले तणाव, शास्त्रज्ञ आणि समाज यांच्या मधले तणाव, शास्त्रज्ञ आणि मानव यांच्यातील तणाव इ. विषय विज्ञानकथांना भरपूर खाद्य पुरवू शकतील. त्यासाठी कसले तरी अमूर्त काल्पनिक भय वाचकांच्या मनात रुजवून भयकथा तयार करायची आवश्यकता नाही. विज्ञानकथा लिहायला स्वत: विज्ञान संशोधक असणे आवष्यक नाही. विज्ञानाची माहिती

मनोरंजक स्वरुपात देणारी बरीच पुस्तके मराठीत नाही तरी इंग्रजीत उपलब्ध आहेत".[२२] सर्वसामान्य माणूस, विज्ञान साहित्य न लिहिणारे साहित्यिक, विज्ञान साहित्यिक विज्ञान साहित्यामध्ये पर्यायाने विज्ञानकथेध्ये महत्वपूर्ण भर घालून मानवी जीवन समृद्ध बनवू शकतात

यशवंत रांजणकर यांच्या विज्ञानकथा विलोभनीय व उत्कट आहेत. 'शेवटचा दिस' या रुपांतरीत विज्ञानकथासंग्रहात विज्ञान व कल्पना यांच्या ह्रदयंगम संगमातून सूर्यमालेतील व बाहेरील अवकाशस्थित ग्रह पूर्वस्थित मानव यांच्या विभिन्न हालचाली-परिणाम यांचे रंजक, रोमांचकारी, थरकाप उडविणारे प्रसंग आहेत. येथे लालित्य व कथेचा घाट अधिक प्रत्ययकारी आहे.

लक्ष्मण लोंढे यांचा '२२जुलै१९५५' हा विविधता दाखविणारा विज्ञानकथासंग्रह आहे. सध्याची वैज्ञानिक प्रगती व विज्ञानाच्या भविश्यात प्रवेश करुन अनेक अतर्क्य घटनांना त्यांनी कथारुप दिले. कधी व्यक्तिमनाच्या अंतरंगात ते प्रवेश करतात. त्यांच्या कथा वाचकांना एका आगळया वातावरणात नेतात. आपल्या कथेत केवळ अवकाष, संचार, परग्रहास्थित माणूस एवढया कल्पना मांडून ते थांबत नाहीत. आजाराची मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सा करणे, माणसाच्या मृत्यूचा अर्थ शोधणे, मानवाची आत्मघातकी, समाजघातकी, स्वार्थी प्रवृत्ती यांचा आपल्या कथेतून ते प्रत्यय देतात.

निरंजन घाटे यांचा 'झू' हा पाश्चात्य वाड्.मयातील त्यांना आवडलेल्या विज्ञानकथांचा अनुवादीत संग्रह आहे. या कथेत अंतराळातील प्रवास, इतर ग्रहांवरील मानव, मानवसदृष्य प्राणी, नव्या संशोधनाचा अभ्यास, त्यातून हाती लागलेली वैचित्र्यपूर्ण माहिती या कल्पनेवर आधारीत आहेत. मानवी मूलभूत प्रवृत्तींना या कथा सामोऱ्या जातात. नारायण धारप यांचा 'अ ब क' हा विज्ञान कथासंग्रह आहे. रेखा बैजल यांचे 'विज्ञान कथा' आणि 'किडनॅपिंग' हे दोन कथासंग्रह आहेत. माधुरी षानभाग या पदार्थविज्ञानाच्या प्राध्यापिका आहेत. त्यांचे विज्ञानाषी घनिष्ठ नाते आहे. विज्ञान हा त्यांच्या अभ्यासाचा, चिंतनाचा विषय आहे.

मराठी विज्ञानकथा अंतराळप्रवास व परग्रहावर प्रवेश या कल्पनेभोवती अधिक घुटमळतात. परग्रहावरील माणूस हा अधिक सशक्त, सक्षम, बुद्धिमान चित्रित केला आहे, तर कुठे दुबळा, खुरटा व मागासलेला चित्रित केला आहे. विज्ञानकथा ही नवीन जीवन व विज्ञान यांचा माफक, मनोज्ञ, सुसंगत असा संयोग असावा अषी अपेक्षा आहे. 'सृष्टीज्ञान' मासिकाचे दिवाळी अंक 'विज्ञान कथा विषेशांक' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यातून बऱ्याच अशा विज्ञान कथा वाचकांच्या पुढे आल्या. विज्ञान कथेची समीक्षा करताना डॉ. रा. गो. चवरे म्हणतात की, "नवल व वाड्.मय शोभा या मासिकांतून विज्ञान कथा पुढे येऊन अनेक प्रतिश्ठित वाड्.मयीन मासिकांतून आज ती लिहिली जाते. दरवर्शी नावाजलेल्या प्रसिद्ध दिवाळी अंकातून ती मिरवित आहे. तरीपण तिचा प्रवाह नवकथेच्या तुलनेत क्षीणच आहे. मराठी विज्ञानकथेची होणारी निर्मिती ही बहुतांष रुपांतरीत, भाषांतरीत किंवा इंग्रजी वाड्.मयातून चक्क चोरलेली आहे. कित्येक कथा लेखकांनी ऋणनिर्देष न करता दुसरीकडून घेतलेल्या कथा स्वतःच्या नावावर दिलेल्या आहेत".[२३] विज्ञान साहित्याचा व विज्ञानकथेचा विकास ज्या प्रमाणात व्हायला पाहिजे त्याप्रमाणात झालेला नाही असे दिसून येते.

**समारोप:-**

मराठी कथावाड्.मयात आज आषयाचे अनोखेपण, अभिव्यक्तीचा तऱ्हेवाईकपणा घेऊन विपुल कथानिर्मिती होताना दिसते. जीवनाच्या एके काळच्या संपन्नेनंतर उद्भवलेल्या उद्ध्वस्ततेमुळे ही अर्थशून्यता, निरर्थकता पुढे आलेली आहे. पाश्चात्य साहित्य संप्रदायांचाही तिच्यावर प्रभाव जाणवतो. बदलत्या व बदललेल्या जीवनवास्तवाचे आमूलाग्र व मूलभूत वैशिष्ट्य अधोरेखित करताना कधी स्वेच्छेने तर कधी जाणीवपूर्वक या कथांनी विविध प्रवाह निर्माण केले आहेत. नवकथेच्या पलीकडील कथा पाहिल्यास कथेच्या तंत्रात, मांडणीत आणि आषयात बराच बदल झालेला आहे हे दिसून येते. मानवी अस्तित्वविषयक प्रश्नांनी कथाकार ग्रस्त आहेत. महानगरात यांत्रिकतेचे आक्रमण आणि ग्रामीण परिसरात महानगरी संस्कृतीचे आक्रमण या गोष्टींनी ते अस्वस्थ आहे. मानवाचे एकाकी जीवन, त्यांनी जोडलेल्या संबंधावरचे, संषयाचे, मत्सराचे सावट, सामाजिक संस्थांची निरर्थकता या गोष्टींचे चित्रण या कथासाहित्यातून झालेले आहे. दलित व ग्रामीण कथेतून जीवनातील दारिद्रय, अज्ञान, वर्गसंघर्श याबरोबरच स्थलकालबद्धता बोचू लागते. जीवनातील निरर्थतकता, अर्थशून्यता नवकथेने प्रभावीपणे प्रतिपादन केली. स्त्रियांच्या आणि दलितांच्या अनुभवास येणारी सामाजिक विषमता, शहरी आणि ग्रामीण परिसरातील राजकारण, बुद्धिजीवी, मध्यमवर्गीय व्यक्तीची अगतिकता हेही विषय या कथांमधून आलेले आहेत. नवकथे नंतर दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, कथा आदिवासी आणि विज्ञान कथा या प्रवाहात मराठी कथा अधिक समृद्ध व संपन्न होत गेली. या लेखात मराठी कथेच्या वाटचालीचा धावता आढावा घेतला आहे.

----------

**संदर्भ सूची:-**


一) इंदुमती शेवडे, 'मराठी कथा: उद्गम आणि विकास' सोमैया पब्लिकेषन्स मुंबई, संक्षिप्त व सुधारित आवृत्ती १९८२, पृ. क्र. ९.

二) डॉ. रा. गो. चवरे, 'मराठी कथा: प्रवृत्ती आणि प्रवाह' सुयष प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००३. पृ. क्र. ४

三) डॉ. प्र. न. जोशी, 'मराठी वाड्.मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती - जानेवारी १९७९. पृ. कृ. ३९८, ३९९.

四) म. ना. अद्वंत, 'प्रदक्षिणा - खंड पहिला', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पहिली आवृत्ती १९४१, पाचवी आवृत्ती १९७२, पुनर्मुद्रण १९९७, पृ. कृ. १०४.

五) डॉ. अंजली सोमण, 'मराठी कथेची स्थितिगती', प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९५. पृ. क्र. ४०१.

六) म. ना. अद्वंत, 'प्रदक्षिणा - खंड पहिला', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पहिली आवृत्ती १९४१, पाचवी आवृत्ती १९७२, पुनर्मुद्रण १९९७, पृ. क्र. १०९, ११०.

七) डॉ. रा. गो. चवरे, 'मराठी कथा: प्रवृत्ती आणि प्रवाह', सुयष प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००४. पृ. क्र. १४.

八) म. ना. अद्वंत, 'प्रदक्षिणा - खंड पहिला', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पहिली आवृत्ती १९४१, पाचवी आवृत्ती १९७२, पुनर्मुद्रण १९९७, पृ. क्र. १२२.

九) म. ना. अद्वंत, 'मराठी लघुकथेचा इतिहास' निहारा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, ५ एप्रिल १९९३, पृ. क्र. १३४.

十) सुधा जोशी, 'कथा: संकल्पना आणि समीक्षा', मौज प्रकाशन, मुंबई. पहिली आवृत्ती १ फेब्रुवारी २०००. पृ. क्र. ३०, ३१.

十一) इंदुमती शेवडे, 'मराठी कथा: उद्गम आणि विकास' सोमैया पब्लिकेषन्स मुंबई, संक्षिप्त व सुधारित आवृत्ती १९८२, पृ. क्र. पृ. क्र. २२३, २२४.

十二) डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण कथा: स्वरुप आणि विकास', साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी १९९२, पृ. क्र. ९१.

十三) अ. ना. देशपांडे, 'आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास', व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली - पुनर्मुद्रण जानेवारी १९७९, पृ. क्र ४८६

十四) आनंद यादव, ''ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि समस्या', मेहता प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती - एप्रिल १९७९. पृ. क्र. १४.

十五) प्रा. चंद्रकुमार नलगे, डॉ. गंगाधर पानतावणे (संपादक), 'दलित कथा', मेहता प्रकाशन, पुणे. जुलै १९९४, पृ. क्र. ६.

十六) अंजली सोमण, 'मराठी कथेची स्थितीगती', प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९५, पृ. क्र. १९७.

十七) तत्रैव, पृ. क्र. १०२.

十八) इंदुमती शेवडे, 'मराठी कथा: उद्गम आणि विकास', सोमैया पब्लिकेषन्स मुंबई, संक्षिप्त व सुधारित आवृत्ती १९८२, पृ. क्र. पुरवणी.

十九) वाहरु सोनवणे, 'अध्यक्षीय भाशण, विद्रोही साहित्य संमेलन, कोल्हापूर २०००', 'शतकातील दलित विचार', संपा. शरणकुमार लिंबाळे', दिलीपराज प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १५ जुलै २००१, पृ. क्र. ४१४.

二十) डॉ. रा. गो. चवरे, 'मराठी कथा: प्रवृत्ती आणि प्रवाह' सुयष प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती सप्टेंबर २००३, पृ. क्र. ३६३.

二十一) डॉ. सुमनोहर, 'मराठी मित्र' डिसेंबर २००३ ते मार्च २००४, मराठी विभाग, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे. पृ. क्र. १३.

二十二) जयंत नारळीकर, 'यक्षांची देणगी', मौज प्रकाशन, मुंबई. आवृत्ती पाचवी, जून २००१. पृ. क्र. १२,

१३.
二十三) डॉ. रा. गो. चवरे, 'मराठी कथा: प्रवृत्ती आणि प्रवाह' सुयष प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती सप्टेंबर २००३, पृ. क्र. ३७५.